दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०६२ • पुणे • शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



नियमित व्यायामातून टाइप २ मधुमेहावर नियंत्रण

3



पुण्यात महिलांच्या पुढाकारातून पुण्यात जलसंवर्धनाचा जागर

4

आरंभचा टोला!



ठळक बातम्या

१६ नोव्हेंबरला फुटणार मोठा बॉम्ब

मुंबई (दै. आरंभ पर्व) : अजितदादांच्या अपघातामागील घातपाताच्या चर्चांना नवे वळण, मिळाले आहे. यशवंतराव चव्हाण सेंटरबाहेरील रहस्यमय पोस्टरने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पोस्टरवर "अजितदादांच्या अपघात / घातपातामागे असलेल्यांना वाचवणारा नेता कोण?" असा थेट सवाल या पोस्टरमध्ये विचारण्यात आला आहे. या पोस्टरवर मफलरची प्रतिकृती पाहायला मिळत आहे, मात्र कोणत्याही नावाचा उल्लेख नाही करण्यात आलेला नाही. त्यामुळे १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर येथे नेमकं काय घडणार, या दिवशी कोणता राजकीय बॉम्ब फुटणार, याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दोन्ही राष्ट्रवादी मविआत परत आले तर ते

खरे विलीनीकरण

काँग्रेस नेत्यांचा सूर, स्व. अजित पवार यांच्या दाव्याचा दाखला

मुंबई (दै. आरंभ पर्व)

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे; पण ते भाजपसोबत राहून विलीनीकरण करणार असतील, तर आमचा त्याला पाठिंबा नाही. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली, महाविकास आघाडीत परत आले तरच खरे विलीनीकरण असेल आणि त्याला काँग्रेसचा पाठिंबा असेल, असा सूर प्रदेश काँग्रेसचे नेते लावत आहेत. अजित पवार राष्ट्रवादीच्या आमदारांनी शरद पवार यांची भेट घेतली. ही फक्त तब्येतीची विचारपूस करण्यासाठीची भेट नाही, हा मोठा राजकीय प्लॅन आहे, असे प्रदेश काँग्रेसचे नेते सांगत आहेत.

अजित पवार हे महायुतीमधून बाहेर पडणार होते. भाजपबरोबर त्यांचे जमणार नव्हते. ते २०२८ मध्ये आपण बाहेर पडणार आहोत, एकत्रित आल्याशिवाय पर्याय नाही, असे अजित पवार यांनी काँग्रेसच्या काही वरिष्ठ नेत्यांना सांगितले होते, असे दावे आता काँग्रेसचे नेते करत आहेत. अजित पवार मुख्यमंत्री होणार होते. महायुती सोडून, शरद पवार राष्ट्रवादी, काँग्रेस, ठाकरे शिवसेना यांच्यासोबत जाऊन सरकार बनवण्याचा त्यांचा प्लॅन होता, असा या नेत्यांचा दावा आहे.



दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे; पण ते भाजपसोबत राहून विलीनीकरण करणार असतील, तर आमचा त्याला पाठिंबा नाही. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली, महाविकास आघाडीत परत आले तरच खरे विलीनीकरण असेल, अशी काँग्रेसची भूमिका आहे.

एनसीपी विलीनीकरणाच्या चर्चेत सध्या राजकीय वर्तुळात मोठे वादळ निर्माण झाले आहे. याच संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आदिती तटकरे यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. विलीनीकरणाच्या मुद्द्यावरून तटकरेंना खलनायक का ठरवले जात आहे, असा थेट सवाल आदिती तटकरे यांनी उपस्थित केला आहे. तटकरेंवर सुरू असलेल्या टीकेवर आदिती तटकरे यांनी आपली खंत व्यक्त केली.

काही दिवसांपूर्वीच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठा धक्का दिला होता. शिवसेना ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी शिवसेना ठाकरे गटाची साथ सोडून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर हा उद्धव ठाकरे यांच्यासाठी दुसरा सर्वात मोठा धक्का होता. दरम्यान त्यानंतर आता पुन्हा एकदा एक मोठी बातमी समोर येत आहे. या बातमीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. सोशल मीडियावर एक फोटो चांगलाच व्हायरल झाला आहे. या फोटोमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. हा एकनाथ शिंदे यांचा फोटो असून, त्यावर वेट अँड वॉच 3.0 असा मजकूर लिहिण्यात आला आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शिवसेना शिंदे गटाकडून ऑपरेशन टायगर 3.0 राबवलं जाणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे. हा फोटो चांगलाच व्हायरल होत आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं. मात्र दुसरीकडे महायुतीला मोठा धक्का बसल्याचं पहायला मिळालं. महायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांचा या निवडणुकीत पराभव झाला. लोकसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचे 9 खासदार निवडून आले.


अमित शहा पुणे दौऱ्यावर

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमांना प्राधान्य मिळाल्याची चर्चा
- मुरलीधर मोहोळ यांच्या मॅरेथॉन उद्घाटनाला उपस्थिती नाही

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चेला जोर आला आहे. अशा परिस्थितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पुणे दौऱ्यात भाजपच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमांना अधिक प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. त्यामुळे शहा यांच्या दौऱ्याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

अमित शहा रविवार (ता. १५) आणि सोमवार (ता. १६) असे दोन दिवस पुणे दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात पुणे शहरात त्यांचा एकही मोठा कार्यक्रम नियोजित नाही. दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आयोजित केलेल्या मॅरेथॉनच्या उद्घाटनासाठी शहा उपस्थित राहणार असल्याची चर्चा होती. मोहोळ यांच्यातर्फे शहरात होर्डिंग लावून याची जाहिरातही करण्यात आली होती. मात्र, शहा रविवारी दुपारीच पुण्यात येणार असल्याने ते मॅरेथॉनसाठी उपस्थित राहणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांची निराशा झाली आहे.दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता असलेल्या पुणे जिल्हा परिषदेत स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी शहा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने जय्यत तयारी सुरू केली आहे. खासदार पार्थ पवार यांनी आज (ता. १३) जिल्हा परिषदेत भेट देऊन कार्यक्रमस्थळाची पाहणी केली. गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू आहे. या विलिनीकरणाचा निर्णय कधी होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसताना अमित शहा यांचा पुणे दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. विशेष म्हणजे, रविवारी संध्याकाळपासून सोमवार सकाळपर्यंत शहा यांचा कोणताही सार्वजनिक कार्यक्रम नियोजित नाही. या कालावधीत शहा यांच्यासोबत महायुतीच्या नेत्यांच्या राजकीय चर्चा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



"पुणे शहरात अमित शहा यांचा एकही मोठा कार्यक्रम नाही. त्यामुळे भाजपतर्फे तळेगाव येथील कार्यक्रमासाठी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीचे नियोजन सुरू आहे."

विश्रांतवाडीकरांना ५० वर्षांपासून भाजी मंडईची प्रतीक्षा!

- विक्रेत्यांचे हाल संपणार कधी? सुविधांचा अभाव, उन्ह-पावसाचा मारा अन् सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर
- भाजी विक्रेत्यांनी वाचला समस्यांचा पाढा; महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष



पुणे-निरंजन साळुंके (दै. आरंभ पर्व)

पुणे महापालिकेत समावेश होऊन तब्बल ५० वर्षांचा कालावधी उलटूनही विश्रांतवाडी परिसरातील भाजी विक्रेत्यांना अद्याप हक्काची भाजी मंडई मिळालेली नाही. महापालिका प्रशासनाला या परिसरात स्वतंत्र भाजी मंडई उभारण्यात यश आले नसल्याने विक्रेत्यांना आजही रस्त्यावर बसून व्यवसाय करावा लागत आहे. ना व्यवस्थित बैठक व्यवस्था, ना शेड, ना पिण्याचे पाणी आणि ना स्वच्छतागृह! अशा परिस्थितीत व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून, विश्रांतवाडीकरांना हक्काची भाजी मंडई मिळणार तरी कधी, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

'स्मार्ट सिटी' आणि 'पुणे तेथे काय उणे' अशी ओळख असलेल्या पुणे शहराच्या उपनगरांचाही लोकसंख्येसह झपाट्याने विस्तार झाला आहे. पुणे-आळंदी मार्गावर वसलेला विश्रांतवाडी परिसरही त्याला अपवाद नाही. रोजगाराच्या शोधात राज्यासह परराज्यांतील अनेक नागरिक या भागात स्थायिक झाले आहेत. मात्र, वाढत्या बेरोजगारीमुळे अनेक तरुणांना खासगी कंपन्यांचे उंबरठे झिजवूनही नोकरी मिळत नसल्याने त्यांनी भाजी विक्रीसारख्या व्यवसायाचा पर्याय स्वीकारला आहे. पूर्वी या मार्गावरील मच्छी मार्केट परिसरात अनेक विक्रेत्यांनी व्यवसाय थाटला होता. मात्र, मंडईमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि सध्या सुरू असलेल्या रस्त्याच्या भुयारी कामामुळे ही मंडई स्थलांतरित करण्यात आली. त्यानंतर साठे बिस्कीट परिसरातील लष्कराच्या जागेत रस्त्यावर विक्रेत्यांना बसविण्यात आले. मात्र, लष्कराची वाहने आल्यावर विक्रेत्यांना आपला व्यवसाय गुंडाळून पुन्हा दुसरीकडे मांडावा लागतो. त्यामुळे रोजच्या या त्रासाने विक्रेते हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे, महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून या व्यावसायिकांना परवाने देण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात त्यांना कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. साधे भाजी विक्रीसाठीचे कट्टे, बैठक व्यवस्था किंवा शेड उभारण्याची तसदीही प्रशासनाने घेतलेली नाही. त्यामुळे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये विक्रेत्यांना उघड्यावरच व्यवसाय करावा लागत आहे. उघड्यावर व्यवसाय करताना पावसाळ्यात अनेकदा पावसाच्या पाण्यामुळे विक्रेत्यांच्या भाज्या वाहून जातात किंवा खराब होतात. त्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. उन्हाळ्यात कडक उन्हामुळे विक्रेते घामाघूम होतात. वर्षानुवर्षे व्यवसाय करूनही साध्या निवाऱ्याची व्यवस्था न झाल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी आहे.

विशेष म्हणजे, येथील प्रत्येक विक्रेत्याकडून महापालिकेच्या अतिक्रमण विभागाला वर्षाकाठी लाखो रुपयांचा महसूल मिळत असल्याचा दावा करण्यात येत आहे. असे असतानाही महापालिकेच्या विद्युत विभागाकडून मंडई परिसरात पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे सायंकाळनंतर अनेक विक्रेत्यांना अंधारातच व्यवसाय करावा लागतो.

या अंधाराचा गैरफायदा घेत काही चोरट्यांकडून विक्रेत्यांच्या गल्ल्यांमधील पैसे चोरण्याचे प्रकार घडत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. दिवसभर मेहनत करून मिळविलेली कमाई चोरीला जात असल्याने अनेक कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहत आहे. पुणे-आळंदी मुख्य रस्त्यालगतच विक्रेते भाजी विक्रीसाठी बसत असल्याने वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. भाजी खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांनाही रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागते. भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल विक्रेत्यांकडून उपस्थित केला जात आहे. एकीकडे ज्या ठिकाणी भाजी मंडईची विशेष आवश्यकता नाही, अशा ठिकाणी महापालिकेच्या मंडई विभागाकडून कोट्यवधी रुपये खर्च करून मंडई उभारण्यात आल्या आहेत. मात्र, ज्या परिसरात प्रत्यक्षात मंडईची गरज आहे, तिथेच स्वतंत्र मंडई उभारण्यात आलेली नाही. त्यामुळे काही ठिकाणी उभारलेल्या मंडई धूळखात पडल्या असताना विश्रांतवाडीतील विक्रेते मात्र आजही रस्त्यावर व्यवसाय करण्यास मजबूर आहेत. अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी आहे. गेल्या ५० वर्षांपासून भाजी मंडईच्या प्रतीक्षेत असलेल्या विक्रेत्यांचे स्वप्न महापालिका प्रशासन पूर्ण करणार तरी कधी, असा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

स्वच्छतागृह नाही, पिण्याच्या पाण्याचीही वानवा!

भाजी मंडई परिसरात ग्राहक आणि विक्रेत्यांसाठी महापालिकेच्या वतीने स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे विशेषतः महिला विक्रेत्यांची मोठी कुचंबना होत आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा नसल्याने विक्रेत्यांना विकत पाणी आणून तहान भागवावी लागत आहे.

मंडई विभागाची जबाबदारी नसल्याचा निरीक्षकांचा दावा!

विश्रांतवाडी परिसरातील रस्त्यावर भाजी विक्रीसाठी बसणाऱ्या विक्रेत्यांना व्यवसाय करण्यासाठी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने परवाने देण्यात आले आहेत. त्यामुळे या विषयाशी मंडई विभागाचा काहीही संबंध नाही.

— मोहन बागुल, मंडई निरीक्षक, पुणे महानगरपालिका

अधिकारी आमच्या अडचणी समजून घेत नाहीत!

आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात भाजी विक्रीचा व्यवसाय करीत आहोत. मात्र, आजपर्यंत महापालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे दररोज विविध अडचणींचा सामना करावा लागतो. आमच्या समस्या समजून घेण्यासाठी कोणताही अधिकारी पुढाकार घेत नसल्याची खंत आहे.

— पूजा कांबळे, भाजी विक्रेती

विक्रेत्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर!

परिसरातील पुणे-आळंदी रस्त्यालगत हे व्यावसायिक भाजी विक्रीसाठी बसतात. मात्र, या मार्गावरून वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे विक्रेत्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

— डॉ. स्वप्नील माने, कार्याध्यक्ष, शिवकामगार सेना

महापालिकेच्या दुर्लक्षाचे आश्चर्य!

मी गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरात वर्तमानपत्र विक्रीचा व्यवसाय करीत आहे. येथील भाजी विक्रेत्यांना नेहमीच विविध अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र, महापालिका अधिकारी या समस्यांवर कोणतीही ठोस उपाययोजना करीत नसल्याचे पाहून आश्चर्य वाटते.

— सलीम सय्यद, पेपर विक्रेते

५० वर्षांपासूनचा प्रश्न अद्यापही प्रलंबित!

महापालिका या भागातील विविध विकासकामांना प्राधान्य देत असल्याचे सांगितले जाते. मात्र, गेल्या ५० वर्षांपासून भाजी मंडईचा प्रश्न प्रलंबित आहे. भाजी विक्रेत्यांचा हा मूलभूत प्रश्न मार्गी लागणार तरी कधी, हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून मनाला खटकत आहे.

— जितेंद्र कराळेकर, सामाजिक कार्यकर्ते

गोकुळचं राजकारण : सत्तेचा मलिदा महत्त्वाचा?

कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात 'गोकुळ' म्हणजे केवळ दूध उत्पादकांची सहकारी संस्था नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि राजकीय सत्तेचे महत्त्वाचे केंद्र आहे. हजारो दूध उत्पादक शेतकरी, दूध संस्था, संचालक मंडळ आणि राजकीय नेते यांची गुंतागुंत गोकुळच्या कारभाराशी जोडलेली आहे. त्यामुळे गोकुळमधील प्रत्येक राजकीय हालचालीला जिल्ह्याच्या राजकारणात विशेष महत्त्व प्राप्त होते.



सहकार चळवळीचा मूळ उद्देश शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे आणि ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण करणे हा होता. मात्र, सहकारी संस्थांच्या भोवती राजकीय सत्ताकारणाचे वलय निर्माण झाले की मूळ उद्देश मागे पडण्याची भीती निर्माण होते. गोकुळच्या राजकारणाकडे पाहताना हाच प्रश्न प्रकर्षाने समोर येतो. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या गोकुळच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या, तर महायुतीच्या पॅनेलला १२ जागा मिळाल्या. या निकालातून मतदारांचा कौल समविचारी आघाडीच्या बाजूने असल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र, त्यानंतर अध्यक्ष निवडीच्या प्रक्रियेत शासननियुक्त संचालकांच्या मतदानाच्या अधिकाराचा मुद्दा केंद्रस्थानी आला. ६ नोव्हेंबरला राज्य सरकारने मोठ्या उलाढालीच्या सहकारी संस्थांमध्ये पाच शासननियुक्त संचालकांची तरतूद करणारा अध्यादेश काढला. त्यापैकी चार संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. या निर्णयामुळे गोकुळमधील सत्तेचे गणित बदलले. १० नोव्हेंबरला झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश पाटील यांना १६ मते मिळाली, तर शशिकांत पाटील चुयेकर यांना १३ मते मिळाली. परिणामी महायुती समर्थित उमेदवार अध्यक्षपदी निवडून आले. विरोधकांनी या प्रक्रियेवर आक्षेप घेतला आहे.

या संपूर्ण घडामोडींकडे केवळ कोण जिंकले आणि कोण हरले, या राजकीय दृष्टिकोनातून पाहणे अपुरे ठरेल. कारण गोकुळच्या सत्तेचा संबंध केवळ एका अध्यक्षपदाशी नाही, तर हजारो दूध उत्पादकांच्या आर्थिक भवितव्याशी जोडलेला आहे.

सहकारी संस्थांमध्ये निवडणुका होतात, पॅनेल उभे राहतात, राजकीय पक्ष पाठिंबा देतात, यात गैर काहीच नाही. परंतु निवडणुकीनंतर सत्तेचे गणित बदलण्यासाठी कायद्यातील तरतुदींचा वापर झाल्याची भावना निर्माण झाली, तर सहकार व्यवस्थेच्या स्वायत्ततेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याच्या निर्णयाचे समर्थन करणारे आणि विरोध करणारे असे दोन मतप्रवाह निर्माण झाले आहेत. एका बाजूला सरकारला सहकारी संस्थांच्या कारभारात सहभागाचा अधिकार असल्याचा युक्तिवाद होऊ शकतो; तर दुसऱ्या बाजूला निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या बहुमतावर अशा नियुक्त्यांचा प्रभाव पडू नये, अशी भूमिका मांडली जात आहे.


या वादाचा अंतिम न्यायालयीन आणि कायदेशीर निकाल काहीही लागो; पण सहकारी संस्थांच्या लोकशाही प्रक्रियेवर शेतकऱ्यांचा विश्वास कायम राहणे अधिक महत्त्वाचे आहे. गोकुळची वार्षिक उलाढाल जवळपास चार हजार कोटी रुपयांची असून सुमारे ४.४१ लाख दूध उत्पादक आणि १,८१० गावांपर्यंत या संस्थेचे जाळे विस्तारलेले आहे. त्यामुळे गोकुळवरील नियंत्रण म्हणजे केवळ आर्थिक संस्थेवरील नियंत्रण नसून पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणातील प्रभावाचेही केंद्र आहे. मात्र, या सगळ्या राजकीय संघर्षात दूध उत्पादकांच्या प्रश्नांचे काय? दूधाला मिळणारा दर, पशुखाद्याच्या वाढत्या किमती, जनावरांच्या औषधोपचारांचा खर्च, दूध संकलनातील पारदर्शकता, संस्थेचा विस्तार आणि उत्पादकांना मिळणारा आर्थिक लाभ या प्रश्नांना राजकीय सत्तासंघर्षापेक्षा अधिक महत्त्व मिळायला हवे.

संचालक मंडळात कोणत्या पक्षाचे किती सदस्य आहेत, अध्यक्ष कोणत्या गटाचा आहे आणि सत्तेचे समीकरण कोणाच्या बाजूने झुकले आहे, यापेक्षा दूध उत्पादकांच्या जीवनात किती सकारात्मक बदल घडतो, यावर गोकुळच्या यशाचे मोजमाप झाले पाहिजे. गोकुळमधील शासननियुक्त संचालकांच्या मतदानाच्या अधिकाराबाबतचा वाद अद्याप संपलेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे कायदेशीर प्रक्रियेचा पुढील निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. परंतु न्यायालयीन निकालाने राजकीय वाद संपला, तरी दूध उत्पादकांच्या मनातील प्रश्न संपतीलच असे नाही. सहकारी संस्थेच्या कारभारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि उत्पादकांचा सहभाग या तीन गोष्टींची हमी मिळणे आवश्यक आहे. गोकुळच्या सत्तेसाठी राजकीय नेत्यांनी दाखवलेली ताकद आता संस्थेच्या विकासासाठीही दिसली पाहिजे. निवडणुकीच्या काळात दूध उत्पादकांच्या हिताच्या घोषणा करणाऱ्यांनी प्रत्यक्ष कारभारात त्या घोषणांचे प्रतिबिंब दाखवावे.

गोकुळ कोणाचे, हा प्रश्न राजकीय व्यासपीठावर रंगवण्यापेक्षा गोकुळ कोणासाठी, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. गोकुळ कोणत्याही एका पक्षाचे, नेत्याचे किंवा गटाचे नाही. ते दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या कष्टातून उभे राहिलेले सहकाराचे व्यासपीठ आहे. राजकारण बदलत राहील, सत्ताधारी बदलतील, अध्यक्ष बदलतील; पण गोकुळच्या दूध उत्पादकांचा घाम आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था कायम राहणार आहे. त्यामुळे गोकुळच्या सत्तेची खुर्ची कोणाला मिळाली, यापेक्षा त्या खुर्चीवर बसणाऱ्यांनी दूध उत्पादकांसाठी काय केले, याचा हिशेब देणे अधिक गरजेचे आहे. शेवटी गोकुळचा खरा विजय अध्यक्षपदाच्या निवडणुकीत नव्हे, तर दूध उत्पादकांच्या चेहऱ्यावरील समाधानात दिसला पाहिजे. सहकाराचा झेंडा राजकारणाच्या वाऱ्यावर नव्हे, तर शेतकऱ्यांच्या विश्वासावर फडकला पाहिजे!

• • •

थोडक्यात पण महत्वाचे



महिला वसतिगृहासाठी अनिल अग्रवाल यांच्याकडून ५ कोटींचे योगदान

पुणे (आरंभ पर्व) : वेदांता समूहाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी मुंबईतील मालाड पश्चिम येथे महिलांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागातून मुंबईत उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या सुमारे २०० महिलांना या वसतिगृहाचा लाभ मिळणार आहे. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या 'परमार्थ रत्न सन्मान' सोहळ्यात ही घोषणा करण्यात आली. या उपक्रमांतर्गत महिलांना सवलतीच्या दरात निवास, भोजन, ग्रंथालय आणि मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. घरापासून दूर राहून शैक्षणिक आणि व्यावसायिक ध्येय साध्य करू इच्छिणाऱ्या तरुणींसाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आलेले हे योगदान शिक्षण अधिक सुलभ करण्यासह महिलांना स्वावलंबन आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने पुढे जाण्यास सक्षम करण्याच्या अग्रवाल यांच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. अनिल अग्रवाल फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारे शिक्षण हे वेदांता समूहाच्या सामाजिक उपक्रमांचे प्रमुख क्षेत्र आहे. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्याचा विचार करणाऱ्या दृष्टिकोनातून समूहाकडून बालशिक्षण, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यापर्यंत विविध उपक्रम राबविले जातात. शिक्षणापासून रोजगारापर्यंतचा एकात्मिक मार्ग निर्माण करण्याचा यामागील उद्देश आहे.

पुण्यातील शिक्षक पर्यावरण शिक्षणाला देत आहेत अधिक अर्थपूर्ण रूप



पुणे (आरंभ पर्व) : झाडे एकमेकांशी कसा संवाद साधतात याच्या शोधापासून ते निसर्गाचे निरीक्षण आणि खेळांमधून शिकण्यापर्यंत, पुण्यातील शिक्षक वर्गातील धडे मुलांच्या दैनंदिन अनुभवांशी जोडण्याचे नवनवे मार्ग शोधत आहेत. सोशल इमोशनल अँड इकॉलॉजिकल नॉलेज (SEEK)© अभ्यासक्रमातील सहभाग आणि रंगीत SEEKer कम्युनिटीमधील योगदानाबद्दल रंगीतने सहा शिक्षकांना सप्टेंबर 2026 चे 'टीचर ऑफ द मंथ' म्हणून सन्मानित केले आहे. हे सहा शिक्षक आहेत: ओंकार प्राथमिक विद्यालय, वारजे येथील जुबेदा पटेल; विष्णुपंत तांबे शाळेतील संगीता शिंदे; वसंतदादा पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील किशोर तरडे; क्रांतिवीर चापेकर विद्यालयातील श्वेता उपाध्ये आणि छाया सुरवसे; तसेच प्रथमेश प्राथमिक विद्यालयातील अंजली झिटे. गेल्या काही महिन्यांपासून रंगीतचा 'टीचर ऑफ द मंथ' उपक्रम अशा शिक्षकांचा गौरव करत आहे, जे वर्गात नवनवीन उपक्रमांचे प्रयोग करत राहतात, आपल्या अध्यापनाच्या अनुभवांवर चिंतन करतात आणि एकमेकांकडून शिकतात.

सांस्कृतिक केंद्रे व नाट्यगृहांच्या चौमाही आरक्षणासाठी मागविले अर्ज

- **१ जानेवारी ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीसाठी आरक्षण प्रक्रिया**
- **१५ ते २५ नोव्हेंबरदरम्यान अर्ज करण्याचे आवाहन**

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक केंद्रे विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध सांस्कृतिक केंद्रे आणि नाट्यगृहांच्या चौमाही आरक्षण वाटपाची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२७ ते ३० एप्रिल २०२७ या कालावधीतील कार्यक्रमांसाठी इच्छुक व्यक्ती आणि संस्थांकडून आरक्षण अर्ज मागविण्यात आले आहेत. या आरक्षणासाठी इच्छुकांना १५ नोव्हेंबर २०२६ ते २५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहेत. संबंधित नाट्यगृह अथवा बालगंधर्व रंगमंदिर येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच अर्ज सांस्कृतिक केंद्रे विभागाच्या अधिकृत cultural@punecorporation.org या ई-मेलवर पाठविण्याचीही सोय आहे. आरक्षण प्रक्रियेची सविस्तर माहिती पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक केंद्रे विभागात तसेच महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक व्यक्ती आणि संस्थांनी निर्धारित मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेचे सांस्कृतिक केंद्रे विभागाचे उपआयुक्त डॉ. संतोष टेंगले यांनी जाहीर सूचनेद्वारे केले आहे.

केएसबी लिमिटेडच्या विक्रीत १८.९५ टक्क्यांची वाढ



पिंपरी (आरंभ पर्व) : केएसबी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत दमदार व्यवसायवाढ नोंदवली आहे. जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत कंपनीची विक्री ७७२.७० कोटी रुपयांवर पोहोचली असून, मागील वर्षाच्या तुलनेत १८.९५ टक्क्यांची वाढ झाली आहे. जानेवारी ते सप्टेंबर या पहिल्या नऊ महिन्यांत कंपनीची विक्री २,०६४.७० कोटी रुपये झाली असून, त्यात ८ टक्के वाढ नोंदवण्यात आली. पेट्रोकेमिकल्स, रिफायनरी, ऊर्जा आणि अणुऊर्जा क्षेत्रातील मोठ्या ऑर्डर्समुळे कंपनीच्या व्यवसायाला चालना मिळाली आहे. कैगा अणुऊर्जा प्रकल्पाच्या पाचव्या आणि सहाव्या युनिटसाठी महत्त्वपूर्ण ऑर्डर मिळाली आहे. तसेच आफ्रिकेतील डांगोटे खत प्रकल्प, ओएनजीसी आणि बीपीसीएलच्या प्रकल्पांसाठीही कंपनीला काम मिळाले आहे. ऊर्जा क्षेत्रात बॉयलर फीड पंप आणि कंडेन्सेट एक्स्ट्रॅक्शन पंपच्या निर्यात ऑर्डर्समध्येही वाढ झाली आहे. मात्र, विक्रीत वाढ होऊनही नफ्यावर दबाव कायम आहे. तिसऱ्या तिमाहीत कंपनीचा करपूर्व नफा ७५.६० कोटी रुपये झाला, जो मागील वर्षी ८७.८० कोटी रुपये होता. कंपनीने खर्च नियंत्रण, कार्यक्षमता आणि प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी यावर भर दिला आहे. केएसबीचे विक्री व विपणन विभागाचे उपाध्यक्ष प्रशांत कुमार आणि मुख्य वित्तीय अधिकारी महेश भावे यांनी ग्राहकांचा विश्वास, तांत्रिक क्षमता आणि देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठेतील वाढत्या संधींमुळे भविष्यातील व्यवसायवाढीबाबत सकारात्मक विश्वास व्यक्त केला. १९६० मध्ये भारतात स्थापन झालेली केएसबी लिमिटेड पंप, व्हॉल्व्ह आणि औद्योगिक यंत्रणा निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून, तिचे मुख्यालय पिंपरी येथे आहे.

'तन्वी द ग्रेट' आणि 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो' यांचे वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर!



पुणे (दे. आरंभ पर्व)

यंदाच्या बालदिनानिमित्त झी सिनेमा प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची एक खास पर्वणी घेऊन येत आहे. धैर्य, कल्पनाशक्ती आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याची ताकद अधोरेखित करणाऱ्या दोन प्रेरणादायी कथा या निमित्ताने प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो : एलियन्स का आगमन' या थरारक सुपरहिरो साहसापासून ते 'तन्वी द ग्रेट' या प्रेरणादायी प्रवासापर्यंत, झी सिनेमाच्या या विशेष चित्रपटांची मेजवानी ॲक्शन, भावना आणि आशयपूर्ण कथाकथन यांचा सुंदर मिलाफ सादर करणार आहे. हे चित्रपट केवळ मुलांचे मनोरंजनच करणार नाहीत, तर त्यांना विचार करायला आणि संवाद साधायलाही प्रवृत्त करतील. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून आवर्जून पाहावेत असे हे चित्रपट आहेत. या खास सोहळ्याची सुरुवात दुपारी १.३० वाजता झी सिनेमावर होणाऱ्या 'तन्वी द ग्रेट'च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरने होणार आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना तन्वीच्या असामान्य विश्वात घेऊन जातो. ऑटिझम स्पेक्ट्रमवर असलेली तन्वी ही एक लहान मुलगी असून, तिची अढळ जिद्द आणि दृढनिश्चय तिला असे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरित करतात, जे अनेकांना अशक्य वाटते.

आरपीआयच्या खिश्चन आघाडीतर्फे ५०० महिलांना साडीवाटप

सण-उत्सवांतून सामाजिक विद्वेष दूर करण्याची प्रेरणा घ्यावी : बाळासाहेब जानराव यांचे आवाहन

पुणे (दे. आरंभ पर्व)

दीपावलीचा सण अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याची प्रेरणा देतो, तर भाऊबीजेसारखा सण हेवेदावे विसरून परस्परांमध्ये बंधुभाव निर्माण करण्याचा संदेश देतो. सण-उत्सवांचा योग्य बोध घेऊन समाजातील विद्वेष दूर करण्याची प्रेरणा सर्वांनी घ्यावी, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश महासचिव बाळासाहेब जानराव यांनी केले.



भाऊबीजेनिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या ख्रिश्चन आघाडीच्या वतीने घोरपडी गाव येथील संविधान चौकात सुमारे ५०० महिला भगिनींना साडीवाटप करण्यात आले. या कार्यक्रमात जानराव बोलत होते. त्यांच्या हस्ते तसेच पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या हस्ते महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

जानराव म्हणाले, सध्याच्या काळात विविध कारणांमुळे समाजातील दरी रुंदावत आहे. व्यक्तिगत प्रगतीसोबतच सामाजिक प्रगती साधायची असेल, तर परस्परांमधील संघर्ष टाळून एकोप्याने पुढे जाण्याची गरज आहे. दीपावली आणि भाऊबीजेसारखे सण सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देतात. या सणांमधून प्रेरणा घेऊन समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष क्रिस्तोफर राजमनी यांनी केले. यावेळी पुणे शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, शहर उपाध्यक्ष अर्जुन आल्हाट, महिला अध्यक्षा डॉर्थी थॉमस, राजश्री मुदलियार, वडगाव शेरी महिला अध्यक्षा चांदणी गायकवाड, मुंढवा विभागाध्यक्ष किरण सूर्यवंशी, घोरपडी गाव अध्यक्ष विनेश पिल्ले, स्टॅन्ली नाथन, दिलीप जोसेफ, ॲंजलेंस अँथोनी, येशू दोरास्वामी, ॲग्निस एंथोनी, रवी मुदलियार, सिरीयल मरियान, अंजली पिल्ले, जॉनसिंग मुनवर, राजू मोजेस, सेल्वराज पिल्ले, विनोद रंगा, आबा गायकवाड, सचिन डोळस, शंकर गायकवाड, प्रकाश अल्हाट आदी उपस्थित होते.

नरेंद्र पारखे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा !

राजाभाऊ कांबळे यांच्यासह विश्वरत्न फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी दिल्या शुभेच्छा; सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाचा गौरव

पुणे (दे. आरंभ पर्व)




सामाजिक कार्याची बांधिलकी, निर्भीड पत्रकारिता आणि जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची तळमळ जपत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे 'पुणे सत्ता' वृत्तपत्राचे संपादक तथा विश्वरत्न फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. नरेंद्र पारखे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या वाढदिवस सोहळ्यानिमित्त विश्वरत्न फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत शुभेच्छांचा वर्षाव केला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे प्रदेशाध्यक्ष तथा शहराध्यक्ष मा. राजाभाऊ कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत केक कापून हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विश्वरत्न फाउंडेशनचे उत्सव प्रमुख प्रकाश साळवी, कार्याध्यक्ष सुभाष खडसे आणि सुनील कांबळे यांनी विशेष पुढाकार घेतला. सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रपरिवार यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह प्राप्त झाला. यावेळी विश्वरत्न फाउंडेशनचे अध्यक्ष मधुकर लोखंडे, कार्याध्यक्ष सुभाष खडसे, प्रभाकर शेंडगे, नितीन ओव्हाळ, रवी जाधव, विलास जाधव, गोरखनाथ लांडगे, सुनील कांबळे, प्रकाश साळवी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच व्हिडिओ कॉलद्वारे निलेश जाधव आणि पोलीस कर्मचारी नितीन साळवी यांनीही शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नरेंद्र पारखे यांच्या सामाजिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. समाजातील वंचित, उपेक्षित आणि सर्वसामान्य घटकांचे प्रश्न मांडण्याचे त्यांचे कार्य असेच निरंतर सुरू राहो, त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यश लाभो, अशा सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या. कार्यकर्त्यांचे प्रेम, सहकाऱ्यांची साथ आणि हितचिंतकांच्या शुभेच्छांनी नरेंद्र पारखे यांचा वाढदिवस सोहळा अविस्मरणीय ठरला.

अमर प्रेमनाथमधून त्यांच्या असामान्य कारकिर्दीला उजाळा

पुणे (दे. आरंभ पर्व)



प्रेमनाथजी यांच्या जन्माला १०० वर्षे पूर्ण झाली असली, तरी हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील त्यांचे स्थान आजही अढळ आहे. आपल्या अभिनयाने, व्यक्तिमत्त्वाने आणि पडद्यावरच्या अनोख्या शैलीने प्रेक्षकांच्या मनावर कायमस्वरूपी छाप उमटवणारे प्रेमनाथजी हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या समृद्ध कारकिर्दीचा आणि अतुलनीय योगदानाचा पुन्हा एकदा गौरव करण्यासाठी यंदाच्या नोव्हेंबर महिन्यात झी क्लासिक 'अमर प्रेमनाथ' या विशेष उपक्रमातून त्यांना आदरांजली अर्पण करत आहे. या महिनाभर चालणाऱ्या विशेष सोहळ्यात चार भागांची खास माहितीपट मालिका, त्यांचे सुपुत्र मॉन्टी नाथ यांनी वडिलांच्या स्मृतींना वाहिलेली भावपूर्ण आदरांजली आणि त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांचा विशेष समावेश असणार आहे. ७ नोव्हेंबरपासून दर शनिवारी सकाळी ११:३० वाजता या माहितीपट मालिकेचा एक नवीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला येईल. त्यानंतर दुपारी १२:०० वाजता प्रेमनाथजी यांचा एक विशेष चित्रपट प्रसारित केला जाईल.

सुवर्णसंधी : ठाणे आणि पुण्यात IBVL ची मेगा भरती

पुणे (दे. आरंभ पर्व)

ठाणे मुख्यालय असलेल्या इम्पेरेटिव्ह बिझनेस व्हेंचर्स लिमिटेड (IBVL) या महिलांनी स्थापन केलेल्या तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन सेवा क्षेत्रातील कंपनीने ठाणे आणि पुणे येथे २,००० हून अधिक पदांसाठी मेगा भरती मोहीम जाहीर केली आहे. या माध्यमातून फ्रेशर्स तसेच अनुभवी उमेदवारांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या भरती मोहिमेत बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा (BFSI), आरोग्यसेवा, ई-कॉमर्स आणि कृषी क्षेत्रांशी संबंधित विविध पदांचा समावेश आहे. ग्राहक सेवा, व्हॉइस, नॉन-व्हॉइस, ई-मेल, चॅट आणि बॅक ऑफिस ऑपरेशन्स अशा विभागांमध्ये उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. बारावी उत्तीर्ण, पदवीपूर्व तसेच पदवीधर उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे.

विलिनीकरणाच्या चर्चांना उमेश पाटील यांचा पूर्णविराम!

- **'ना औपचारिक, ना अनौपचारिक चर्चा; ना आमच्या बाजूने, ना त्यांच्या बाजूने'; तथाकथित सूत्रांवर विश्वास न ठेवण्याचे माध्यमांना आवाहन**

उरुळी कांचन (दे. आरंभ पर्व)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलिनीकरणाबाबत गेल्या आठवडाभरापासून प्रसारित होत असलेल्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे पक्षाचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. विलिनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा सुरू नसून, ना औपचारिक ना अनौपचारिक पातळीवर अशी चर्चा झाली आहे. तसेच आमच्या बाजूने किंवा त्यांच्या बाजूने कोणताही प्रस्ताव नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. पुण्यात उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना पक्षाचे आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते भेटणे स्वाभाविक आहे. मतदारसंघातील विकासकामे, जिल्हा नियोजन समितीचे प्रश्न आणि मंत्रालयातील प्रलंबित कामांसंदर्भात होणाऱ्या या नियमित भेटींना विलिनीकरणाच्या चर्चेचा किंवा राजकीय बैठकींचा रंग देणे चुकीचे असल्याचे पाटील यांनी म्हटले.

खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनीही विलिनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे स्पष्ट केले आहे. असे असताना तथाकथित सूत्रांच्या आधारे बातम्या प्रसारित करून पक्षाबाबत संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. माध्यमांनी अशा अविश्वसनीय सूत्रांवर विश्वास न ठेवता राष्ट्रवादी काँग्रेससंदर्भातील कोणतीही बातमी प्रसारित करण्यापूर्वी पक्षाचे अधिकृत प्रवक्ते किंवा प्रमुख नेत्यांकडून वस्तुस्थितीची खातरजमा करावी, असे आवाहन उमेश पाटील यांनी केले. 'सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं!' असे सांगत माध्यमांची विश्वासार्हता कोणाच्याही छुप्या राजकीय अजेंड्यासाठी पणाला लावली जाऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्ट मठा भाऊबीज साजरी

दापोडी (आरंभ पर्व) : दापोडी येथे श्री अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्ट मठा मध्ये भाऊबीज निमित्त आरोग्य महिला कर्मचारी यांना कै. हभप लक्ष्मण कणसे यांच्या स्मरणार्थ भाऊभेट म्हणून बहीणस साडी चोळी देऊन भाऊबीज साजरी करण्यात केली. प्रेमाचा मायेचा आणि भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याचा भाऊ हा आयुष्यातील न बोलणारा रक्षक असतो. नशीबवान असते ती बहीण जिच्या डोक्यावर भावाचा हात असतो, आणि प्रत्येक संकटात त्याची साथ असते. बहिण भावाचे नाते म्हणजे प्रेम विश्वास आणि आपुलकीचा सुंदर संगम.दादा तुला भाऊ बीजेच्या आभाळाभर शुभेच्छा तू पाठीशी असताना आभाळ देखील ठेंगणे वाढतील, तुझ्या माती लावते चंदनाचा टिळा, दादा तुझ्या दीर्घायुष्यासाठी देवाकडे करते प्रार्थना, मिळून भांडून, रागवून सुद्धा प्रेम न कमी होणार नातं म्हणजेच भाऊ बहिणीचं. बालपणीच्या गोड आठवणी आणि आयुष्यभराची साथ म्हणजे आपलं नातं भाऊ बहिणीचं. कार्यक्रमात महिला आरोग्य कर्मचारी यांनी भाऊबीजे निमित्त सांप्रदायिक क्षेत्रातील भावाला ओवाळून एकमेकांचे तोंड गोड केले तसेच श्रीमती हभप विजया कणसे, दिपाली कणसे, मनीषा डोळस, सारीका कणसे, पायल कणसे, भारती झाटे, मृणाल कणसे, माया कणसे, निलीमा लांडगे, रेणुका डिगोळे, यांनी हभप लक्ष्मण कणसे, हभप संजय कणसे, हभप ज्ञानेश्वर भाडाळे, हभप निलेश कणसे, हभप उमेश कणसे, हभप निलेश कणसे, हभप नरहरी लांडगे, हभप प्रवीण नलावडे यां संप्रदायातील क्षेत्रातील व्यक्तींना ओवाळून भाऊबीज साजरी केली.



खडकीतील शिवसाई मंदिरात दीपोत्सव संपन्न

खडकी (आरंभ पर्व) : खडकी येथील मुळा नदी घाटा जवळील पुरातन श्री महादेव मंदिर व साईबाबा मंदिर परिसरात दिवाळी पाडवा सणाचे औचित्य साधून हजारो दीप ज्योती शिवसाई भक्तांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत द्वीप प्रज्वलित करण्यात आले. याप्रसंगी सनई चौघडांच्या संगीतमय वातावरणात व आकर्षक रांगोळी मंदिर परिसरात सुशोभित करण्यात आली होती. मंदिराच्या सभोवताली आकर्षक आकाश कंदील व विद्युत रोषणाईने सजवण्यात आला होता. स्वस्तिक आणि दीपज्योती यांच्या सुबक नक्षी कामाने असंख्य दीप प्रज्वलित झाल्याने रात्रीच्या अंधकारात हा मंदिर परिसर अधिक खुलून दिसत होता. दिवाळी पाडवा सण शिवसाई चरणी भक्तांनी दीपज्योती प्रज्वलित करून भगवंत चरणी आपली सेवा अर्पण करून साईबाबा चे नामस्मरण पठण व महादेव मंदिरात आरती व पूजन करून शिवसाई भक्तांनी एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या, याप्रसंगी पुणे महानगरपालिकेचे नगरसेविका सपना छाजेड, आनंद छाजेड, मंदिराचे विश्वस्त सुभाष नाना कचरे, बाळासाहेब आहेर, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष तुषार गांधी, अमित कचरे, शुभम वाघमारे, प्रा. डॉ.अभिषेक आहेर, चेतन माने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी दीपक चार्य, राज पिल्ले, नितीन निंबाळकर, एस.कुलकर्णी, संतोष गव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन श्री महादेव मंदिर देवस्थान व साईबाबा देवस्थानच्या वतीने करण्यात आले.

बसथांब्यांच्या पुनर्रचनेचा आराखडा मात्र अद्याप कागदावरच

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील मध्यवर्ती भागासह प्रमुख रस्त्यांवरील रिक्षा व 'पीएमपी' बसथांब्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आखलेली पुनर्रचनेची योजना अद्याप कागदावरच आहे. महापालिका, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) व वाहतूक पोलिसांनी संयुक्त सर्वेक्षण करूनही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास प्रशासनाकडून विलंब केला जात आहे. शहरातील अनेक प्रमुख रस्ते, चौकांचे दर्शनी भाग, सिग्नललगत आणि रस्त्यांच्या वळणांवर बसथांबे व रिक्षा स्टँड आहेत. यामुळे रस्त्यांवर वाहनांच्या लांब रांगा लागतात, ज्याचा परिणाम इतर दिशांच्या वाहतुकीवरही होतो. बस थांबल्यानंतर पाठीमागील वाहने उजव्या बाजूने पुढे जाण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा अपघाताची शक्यता निर्माण होते. अनेकदा यावरून बसचालक व अन्य वाहनचालकांमध्ये वादाचे प्रसंग घडत आहेत. विशेषतः बसथांब्यांच्या परिसरात होणारी रिक्षांची गर्दी, प्रवाशांसाठी रस्त्यात थांबणाऱ्या रिक्षा आणि अनधिकृत पार्किंगमुळे कोंडीत भर पडत आहे. शहरात पूर्वी ५० हजार रिक्षा होत्या, आता ही संख्या दोन लाखांपर्यंत पोहोचली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी थांब्याच्या जागा बदलण्याची प्रक्रिया हाती घेतली असली तरी, प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झालेली नाही. पुणे शहरात एक हजारांपेक्षा जास्त रिक्षा थांबे आहेत. मेट्रोचे काम, रस्ते रुंदीकरण आणि अन्य पायाभूत सुविधांमुळे अनेक जुन्या थांब्यांच्या जागा बदलल्या आहेत. थांब्यांसोबतच रस्त्यांवरील बेशिस्त व अनधिकृत पार्किंगचा प्रश्नही गंभीर आहे.

नीरा नदीत पाणी सोडण्याबाबत १६ नोव्हेंबरला पुण्यात बैठक

नीरा नरसिंहपूर (आरंभ पर्व) : नीरा नदीमध्ये नागरिकांना व जनावरांना पिण्याचे पाणी व चाऱ्यासाठी पाणी सोडण्यासंदर्भात पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी फोनद्वारे आंदोलनकर्त्यांशी बोलताना दिल्याने सराटी (ता. इंदापूर) येथील रास्ता रोको आंदोलन थांबविण्यात आले. सराटी येथे संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर नीरा नदी काठावरील इंदापूर व माळशिरस तालुक्यातील तीस गावातील हजारो शेतकरी, महिला व नागरिकांनी जवळपास अडीच तास रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, प्रदीप गारटकर, अप्पासाहेब जगदाळे, श्रीमंत ढोले, मदनसिंह मोहिते पाटील, भरत शहा, उदयसिंह पाटील, महादेवराव घाडगे, दत्तात्रेय घोगरे, हनुमंत कोकाटे, मयूरसिंह पाटील, शिवाजी मोहिते, सत्यप्रभा मोहिते पाटील, ईशिता मोहिते पाटील आदी मान्यवरांसह रास्ता रोकोसाठी शेतकरी, नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय आहार आणि नियमित व्यायामातून टाइप २ मधुमेहावर नियंत्रण

- सहा महिन्यांत ६०.९ टक्के रुग्ण रेमिशनमध्ये!
- पुण्यातील चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूट आणि छत्रपती संभाजीनगरमधील डॉ. काळे क्लिनिकचा संयुक्त अभ्यास
- वजनात सरासरी ४.७ किलो घट, एचबीए१सीमध्येही लक्षणीय सुधारणा



पुणे (दै. आरंभ पर्व)

टाइप २ मधुमेहाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास पारंपरिक भारतीय आहारपद्धती आणि नियमित व्यायामाच्या मदतीने रक्तातील साखरेचे नियंत्रण सुधारण्यासह मधुमेह रेमिशन अवस्था (औषधांशिवाय ठरावीक काळ रक्तातील साखर नियंत्रित राहणे) साध्य करणे शक्य असल्याचे एका नवीन अभ्यासातून समोर आले आहे. पुण्यातील चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूट आणि छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. काळे डायबेटिस अँड सायकिअॅट्री क्लिनिक यांच्या संयुक्त संशोधनात सहा महिन्यांच्या आहार व जीवनशैलीविषयक हस्तक्षेपानंतर ८७ पैकी ५३ म्हणजेच ६०.९ टक्के रुग्णांमध्ये मधुमेहाची रेमिशन अवस्था आढळून आली आहे. हा अभ्यास आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'डायबेटिस अँड मेटाबॉलिक सिंड्रोम : क्लिनिकल रिसर्च अँड रिव्ह्यूज' या एल्सेव्हियरच्या वैद्यकीय नियतकालिकात २०२६ मध्ये प्रकाशित झाला आहे. दोन वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीपासून टाइप २ मधुमेह असलेल्या ८७ प्रौढांचा या अभ्यासात समावेश करण्यात आला होता. या अभ्यासात सहभागी रुग्णांना स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होणाऱ्या आणि आरोग्यदायी मध्यम कर्बोदकयुक्त भारतीय आहाराचा अवलंब करण्यास सांगण्यात आले. यामध्ये बहुधान्यांच्या पोळ्या, डाळी, मोड आलेली कडधान्ये, हिरव्या पालेभाज्या, सुका मेवा आणि फळांचा समावेश होता. प्रत्येक पदार्थाचे प्रमाण निश्चित करून कर्बोदके, प्रथिने आणि स्निग्ध पदार्थ यांचे संतुलन राखण्यात आले होते. याशिवाय दररोज ४० मिनिटे चालणे आणि १० मिनिटे दीर्घ श्वसनाचे व्यायाम करण्याचा सल्ला देण्यात आला.

सहा महिन्यांच्या कालावधी नंतर सहभागी रुग्णांच्या आरोग्यात सकारात्मक बदल दिसून आले. त्यांचे वजन सरासरी ४.६७ किलोने कमी झाले, तर एचबीए१सीची सरासरी पातळी ७.३२ टक्क्यांवरून ६.२७ टक्क्यांपर्यंत खाली आली. नियमित चालण्याच्या व्यायामालाही विशेष महत्त्व असल्याचे दिसून आले. निर्धारित वेळापत्रकानुसार किमान ८० टक्के दिवस चालण्याचा व्यायाम करणाऱ्या व्यक्तींमध्ये रेमिशन अवस्था प्राप्त होण्याची समायोजित शक्यता इतरांच्या तुलनेत ८.२४ पट अधिक आढळली. चेलाराम हॉस्पिटल डायबेटिस केअर अँड मल्टिस्पेशालिटीच्या क्लिनिकल सर्व्हिसेस विभागप्रमुख डॉ. वेदवती पुरंदरे यांनी सांगितले की, या अभ्यासातील रुग्णांना विशेष खाद्यपदार्थ खाण्याची, जेवण टाळण्याची किंवा ठरावीक वेळ उपाशी राहण्याची आवश्यकता नव्हती. घरात नियमितपणे तयार होणारा पारंपरिक भारतीय आहार योग्य प्रमाणात घेणे आणि दररोज चालण्याचा व्यायाम करणे, एवढेच जीवनशैलीतील प्रमुख बदल होते.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावर तब्बल २ लाख ६५ हजार प्रवाशांचा प्रवास

हिंजवडी (दै. आरंभ पर्व)

रस्त्यांवरील वाहतूक कोंडीत अडकण्याची चिंता नाही की बाजारपेठेत पोहोचल्यावर वाहन लावण्यासाठी जागा शोधण्याची धावपळ... दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेर पडलेल्या हिंजवडी, माण आणि परिसरातील नागरिकांना यंदा मेट्रोच्या रूपाने दिलासा मिळाला. नव्याने सुरू झालेल्या माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावर चार नोव्हेंबरपासून एकूण दोन लाख ६५ हजार ६५० प्रवाशांनी प्रवास केला. दिवाळीनिमित्त पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील बाजारपेठांमध्ये खरेदीची लगबग होती. कपडे, मिठाई, भेटवस्तू आणि सणासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने घराबाहेर पडले. मात्र, सणासुदीच्या काळात खासगी वाहन घेऊन बाजारपेठ गाठताना वाहतूक कोंडी आणि पार्किंग या दोन्ही समस्यांना सामोरे जावे लागते. हिंजवडी परिसरातून पुण्याकडे जाणाऱ्या नागरिकांसाठीही प्रवासासाठी लागणारा वेळ हा महत्त्वाचा प्रश्न असतो. यंदा दिवाळीच्या तोंडावर मेट्रो सेवा सुरू झाल्याने त्यांना सार्वजनिक वाहतुकीचा नवा पर्याय मिळाला. कार्यालयीन प्रवासाबरोबरच खरेदी, नातेवाइकांच्या भेटीगाठी आणि कुटुंबासह फेरफटक्यासाठीही नागरिकांनी मेट्रोला पसंती दिली. मेट्रोचा वापर केवळ कामावर जाण्यासाठी मर्यादित राहिलेला नाही. दिवाळीच्या सुटीत कुटुंबासह बाहेर पडण्यासाठी, नातेवाइकांना भेटण्यासाठी आणि घरी आलेल्या पाहुण्यांना शहराची सफर घडवण्यासाठीही नागरिकांनी या पर्यायाची निवड केली. नव्या मार्गावरून प्रवास करण्याची उत्सुकताही होती.

संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ५२ लाखांचा निधी

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने सिद्धेश्वर मंदिराजवळ खरेदी केलेल्या जागेच्या संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार तथा संस्थेचे उपाध्यक्ष बाबाजी काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) सुमारे ५२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

यावेळी बोलताना आमदार बाबाजी काळे यांनी कंपनीच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. संस्थेच्या माध्यमातून हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, एमबीए महाविद्यालय आणि पॉलिटेक्निक महाविद्यालय अशी चार शैक्षणिक संकुले कार्यरत असून, त्यामधून नऊ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. बदलत्या काळातील व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेता, या नवीन जागेवर शैक्षणिक इमारत उभारण्याचे नियोजन आहे. त्यासाठी विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून आर्थिक सहकार्य मिळविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.



याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सभापती अशोक राक्षे, संस्थेचे सर्व संचालक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी तर आभार मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी मानले.

खराळवाडी गांधीनगरमध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग

- अग्निशामन जवानांच्या तत्परतेने आगीवर नियंत्रण
- स्थानिक नागरिकांचेही मोलाचे सहकार्य

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

खराळवाडी-गांधीनगर परिसरातील खदानीतील कचऱ्याच्या ढिगाऱ्याला अचानक आग लागल्याची घटना घडली. कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरले होते. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या दोन वाहनांसह १५ जवानांनी घटनास्थळी पोहोचून सुमारे पाचशे मीटर अंतरावर पाईप अंथरुण शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

खराळवाडी येथील गांधीनगर परिसरात कचरा साचलेल्या ठिकाणी खदानी जवळ अचानक आग लागल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. आगीची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान आवश्यक यंत्रसामग्रीसह घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी परिस्थितीचा आढावा घेत आग विझविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाची दोन वाहने आणि एकूण १५ अग्निशमन कर्मचारी तैनात करण्यात आले होते. जवानांनी पाण्याचा मारा करून आगीचा फैलाव रोखला आणि काही वेळातच आग आटोक्यात आणली. या बचाव कार्यादरम्यान स्थानिक नागरिक समाधान जाधव आणि रोहन विनकर यांनीही आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना सहकार्य केले. स्थानिक नागरिकांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आग विझविण्याच्या कामात मदत झाली.अशी माहिती गांधीनगर येथील नागरिकांनी दिली. याबाबत महापालिका अग्निशमन उपअधिकारी गौतम इंगोले यांनी सांगितले की, खराळवाडी-गांधीनगर परिसरात कचऱ्याला आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दोन अग्निशमन वाहनांसह १५ अग्निशमन कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. या वेळी स्थानिक नागरिक समाधान जाधव आणि रोहन विनकर यांनीही मदत केली. अग्निशमन दलाच्या जवानांनी योग्य नियोजन आणि तत्परतेने काम केल्यामुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.



प्राइम व्हिडिओकडून 'कॅम्पस डायरीज सीझन २' या एमएक्स ओरिजिनल कॉलेज ड्रामाचा ट्रेलर प्रदर्शित

मुंबई (दै. आरंभ पर्व)

एक्सक्लुझिव्ह ओरिजिनल कंटेन्टसाठी भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हिडिओने आज 'कॅम्पस डायरीज सीझन 2' या आगामी एमएक्स ओरिजिनल सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित केला. अभिषेक यादव दिग्दर्शित या सीरिजची निर्मिती प्रेम मिस्त्री आणि अभिषेक यादव यांनी केली आहे. या सीरिजमध्ये हर्ष बेनिवाल, ऋत्विक साहोरे, सलोनी गौर, सृष्टी गांगुली, सलोनी पटेल आणि अभिनव शर्मा या कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. नव्या सीझनमध्ये प्रेक्षकांना पुन्हा एकदा कॉलेजच्या विश्वात



घेऊन जाण्यात येणार आहे. या ठिकाणी मैत्रीची कसोटी लागते आणि नातेसंबंध अधिक गुंतागुंतीचे होतात. 'कॉलेज शोज का बाप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सीरिजच्या दुसऱ्या सीझनमध्ये भावनिक चढउतार, अनपेक्षित संघर्ष आणि कॉलेजमधील धमाल पाहायला मिळणार आहे. यलो मॉन्टाज या बॅनरअंतर्गत 'कॅम्पस डायरीज सीझन 2'ची निर्मिती करण्यात आली आहे. पहिल्या सीझनला मिळालेल्या प्रचंड यशानंतर कॉलेज जीवनावर आधारित एक उत्कृष्ट सीरिज म्हणून 'कॅम्पस डायरीज सीझन 2' आपले स्थान अधिक भक्कम करण्यास सज्ज आहे. कॉलेज जीवनावर आधारित इतर सीरिजपेक्षा ही सीरिज वेगळी ठरते, कारण आजच्या तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांचे वास्तववादी चित्रण यात करण्यात आले आहे. मैत्री, पहिले प्रेम, स्वतःच्या क्षमतांबद्दल वाटणारी शंका आणि मोठे होत असताना येणारा दबाव अशा तरुणांच्या आयुष्यातील विविध पैलूंवर या सीरिजमध्ये कोणताही आडपडदा न ठेवता प्रकाश टाकण्यात आला आहे. आजच्या तरुणांसमोरील खऱ्या आव्हानांचे चित्रण यात करण्यात आले असून पडद्यावर आपल्याच आयुष्यातील प्रसंग पाहायला मिळत असल्यामुळे प्रेक्षकांना ही कथा अधिक जवळची वाटते. ट्रेलरच्या सुरुवातीला मित्रांचा ग्रुप पुन्हा एकदा कॉलेजमध्ये एकत्र आल्याचे पाहायला मिळते. जुन्या आठवणींना उजाळा मिळतो आणि नव्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहही दिसून येतो. मात्र, आता बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत आणि त्यांच्यातील नातेसंबंधही पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अभिलाष आणि सुश्मिता यांच्यातील नात्याला नवे वळण मिळते, सान्या आणि राघव एकमेकांच्या अधिक जवळ येतात, तर सुधीर आणि प्रियंका यांच्या नात्यातही काही रंजक घडामोडी घडतात. प्रेमभंग, मतभेद आणि अनपेक्षित प्रसंगांमुळे एकेकाळी अगदी सहज असलेल्या त्यांच्या मैत्रीची नव्याने कसोटी लागते. कॉलेज फेस्टची तयारी, मित्रांमधील गमतीजमती आणि बदलते नातेसंबंध या सगळ्या घडामोडींमध्ये हा मित्रांचा ग्रुप यावेळी तरी एकत्र राहू शकेल का, हा प्रश्न निर्माण होतो.

या सीरिजबद्दल प्राइम व्हिडिओ इंडियाचे संचालक आणि एव्हीओडी कंटेन्ट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "आमच्या सर्वाधिक पाहिल्या गेलेल्या कॉलेज ड्रामापैकी एक असलेली ही सीरिज पुन्हा प्रेक्षकांसमोर आणताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मिळणार हक्काचे घर!

- आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे सदनिका वाटपाचे आदेश
- पहिल्या टप्प्यात आठ कुटुंबांना दिलासा



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

मोशी येथील कचरा डेपोमध्ये झालेल्या भीषण दुर्घटनेत कुटुंबातील कर्त्या व्यक्तींना गमावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना आता हक्काचा निवारा मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना मोफत सदनिका देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, पहिल्या टप्प्यात आठ सदनिकांच्या वाटपाचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. पिंपरी येथील यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पात या सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मोशी कचरा डेपो येथे ८ जुलै २०२६ रोजी झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसोबतच कायमस्वरूपी निवारा मिळावा, यासाठी महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला होता. त्यानुसार २ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या महापालिका सभेत मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मोफत सदनिका देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

त्यानंतर ५ नोव्हेंबर २०२६ रोजी मान्य झालेल्या प्रस्तावानुसार आठ मृत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना सदनिका वाटप करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. यामध्ये अश्विनी गायकवाड, शिवुबाई कुंभार, हर्षदा बने, सुनीता कसबे, कांचन माने, पल्लवी कोरके, मोहिनी वाणी आणि छाया पाटील यांचा समावेश आहे.

दरम्यान, मृत कर्मचारी नागेश गायकवाड यांच्या कायदेशीर वारसांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नाही. संबंधित कागदपत्रे सादर झाल्यानंतर त्यांनाही सदनिका देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नऊही कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सदनिका देण्याचा महापालिकेचा निर्णय कायम आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने सदनिका वाटपाच्या प्रक्रियेला गती दिली. यशवंतनगर येथील एसआरए प्रकल्पातील आठ सदनिका यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांनी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येणार आहे.

दुःखाच्या प्रसंगी महापालिका कुटुंबीयांच्या पाठीशी!

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखाची महापालिका प्रशासनाला पूर्ण जाणीव आहे. या कठीण प्रसंगी प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, आर्थिक मदतीसोबतच हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत आहे.

- डॉ. विजय सूर्यवंशी,
आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

नऊ कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदनिका देण्यात येणार असून, त्यापैकी एका कर्मचाऱ्याच्या वारसांकडून अद्याप कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे सध्या आठ सदनिकांच्या वाटपाचे आदेश जारी करण्यात आले आहेत. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्यात येईल.

- अण्णा बोदडे, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

थोडक्यात पण महत्वाचे

आंबेगाव : काकड आरतीचे आयोजन

मंचर (आरंभ पर्व) : लांडेवाडी तालुका आंबेगाव येथे पहाटेच्या गुलाबी थंडीत विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या गाभाऱ्यात व सभामंडपात मंगलमय वातावरणात अतिशय भक्तिभावाने मृदुंगाच्या गजरात भूपाळी गवळण व अभंगाचे स्वर आळवीत ग्रामीण भागातील अनेक गावांत काकड आरत्यांचे आयोजन करण्यात आले आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासूनच काकड आरतीला प्रारंभ होतो कार्तिक शुद्ध पौर्णिमा पासून देवाला उठवण्यासाठी आणि अंघोळ घालण्यासाठी काकड आरती करण्याची प्रथा आपल्याकडे आहे कोणत्याही साध्या पद्धतीच्या आरती नसते काकड आरतीचा पूर्ण कार्यक्रम जवळ जवळ दोन तास चालतो ज्या सर्वप्रथम देवाला भजनांच्या आणि भुपाळ्यांच्या मंदस्वरात पहिलं उठवलं जातं. त्यानंतर दूध दही मध या सगळ्यांचा वापर करून अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने देवांचा अभिषेक करण्यात येतो. विशेष म्हणजे काही काही ठिकाणी तरी यावेळी देवांना अंघोळ घालताना कोमट पाणी देखील वापरण्यात येतं कारण थंडीची लागलेली लाट असते अभिषेक झाल्यानंतर देवांना पोशाख घातला जातो त्यांना अलंकार व पुष्पहार यांचा वापर करून सजवण्यात येते मग आरती केली जाते सगळं चालू असताना भजन कृष्ण लीलांचे वर्णन असणाऱ्या गवळणी देखील म्हटल्या जातात ज्याला साथ असते टाळ व मृदुंगाचा स्वरांशी त्यातून आपल्या संत साहित्याचे वैभव कळतं आणि वारकरी संप्रदायाकडून हा वारसा जपला जातो.पण आरतीला काकड आरती का म्हणतात असा प्रश्न पडतो जास्त उत्तर अगदी सोप्प आहे म्हणून काकड आरती काकडा म्हणजे कापडापासून तयार केलेली ज्योत ही शुद्ध तुपात भिजवलेली असते आणि ही आरती पहाटे ब्रम्ह मुहूर्तावर केली जाते म्हणजे आपल्या वारकरी संप्रदायाकडून पण आता ही आरती प्रत्येक मंदिरात केली जाते काकड आरती कशी पार पडते माहितीये का तरीही आरती पहाटे चार ते साडेचार सुमारास चालू होते राम कृष्ण हरी मंत्र जपत काकड आरतीच्या दरम्यान पहिले सर्व अभंग विणेकरी गातात आणि नंतर टाळकरी जातात पांडुरंगाच्या सात अभंग मालिका आहे ज्या गायल्या जातात आणि त्यानंतर वासुदेव संत चरण गवळण हे गायलं जातं हे सगळे अभंग गवळणी संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत एकनाथ यांच्यासारख्या अनेक संतांच्या लेखणीतून आलेले आहेत त्यामुळे यातून आपल्या समृद्ध संत साहित्याची आपल्याला नव्याने आठवण होते सगळा कार्यक्रम सभा मंडपात पार पडत असताना गाभाऱ्यात विठ्ठल रुक्माईचा किंवा त्या त्या मंदिरातील देवांचा महाभिषेक सुरू असतो आणि या सगळ्यामुळे एक चैतन्यमय आणि प्रसन्न वातावरण परिसरात असते.

बाबुराव बोत्रे पाटील यांनी दिलेला शब्द पाळला!

कर्मयोगी कारखान्याकडून ऊस उत्पादकांना प्रतिटन ३,३५० रुपये ऊसदर; दुसऱ्या हप्त्याचे १५० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा!

- ओंकार ग्रुपचा शेतकरीहिताचा निर्णय
- पहिल्या ३,२०० रुपयांनंतर दुसऱ्या हप्त्याची रक्कम अदा
- ऊस उत्पादक शेतकऱ्यांमधून समाधानाची भावना

प्रतिटन ३,२०० रुपयांनंतर दुसऱ्या हप्त्याचे १५० रुपये जमा झाल्याने एकूण ऊसदर ३,३५० रुपये झाला आहे. शेतकऱ्यांना मिळालेल्या या वाढीव रकमेचा त्यांच्या आर्थिक नियोजनाला निश्चितच हातभार लागणार आहे. बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरीहिताच्या भूमिकेतून घेतलेल्या या निर्णयाचे ऊस उत्पादक शेतकरी वर्गातून स्वागत होत असून, कर्मयोगी कारखान्याच्या पुढील वाटचालीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीतून पूर्ण करत ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सहयोगी ओंकार शुगर अँड डिस्टिलरी पॉवर प्रा. लि., युनिट ११, इंदापूर या कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रतिटन १५० रुपयांचा दुसरा हप्ता जमा करण्यात आला असून, यापूर्वी अदा केलेल्या प्रतिटन ३,२०० रुपयांसह आता एकूण ऊसदर प्रतिटन ३,३५० रुपये झाला आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता केल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना यापूर्वी प्रतिटन ३,२०० रुपये ऊसबिल अदा केले होते. त्यानंतर आता दुसऱ्या हप्त्यापोटी प्रतिटन १५० रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारा एकूण दर प्रतिटन ३,३५० रुपयांवर पोहोचला आहे. वाढीव हप्त्याची रक्कम थेट खात्यावर जमा झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या आर्थिक गरजांना हातभार लागावा आणि ऊस उत्पादकांचा कारखान्यावरील विश्वास अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने दुसऱ्या हप्त्याची रक्कम अदा करण्यात आली आहे. ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समूहाने साखर उद्योगात विस्तार करताना शेतकरीहिताला नेहमीच केंद्रस्थानी ठेवण्याची भूमिका घेतली आहे. ऊस उत्पादकांना योग्य दर देणे, ऊसबिलांची वेळेत पूर्तता करणे, कारखान्याच्या कामकाजात पारदर्शकता राखणे आणि शेतकरी व कारखाना व्यवस्थापन यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे, या बाबींना समूहाकडून प्राधान्य दिले जात आहे. त्याचाच प्रत्यय दुसऱ्या हप्त्याच्या रकमेच्या वितरणातून आला आहे. साखर कारखान्याची प्रगती ही केवळ उत्पादन आणि आर्थिक उलाढालीपुरती मर्यादित नसून त्यामध्ये ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूक ठेकेदार, कामगार आणि परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचे योगदान महत्त्वाचे असते. या सर्व घटकांचा समन्वय आणि विश्वास कायम राखून कारखान्याची वाटचाल अधिक सक्षम करण्याचा ओंकार ग्रुपचा प्रयत्न आहे.

उदापूर येथे अपघातात तरुणाचा मृत्यू

ओतूर (दै. आरंभ पर्व)

रस्ते अपघातात तरुणांचे बळी जाण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. गुरुवारी उदापूर गावच्या हद्दीत अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात ओंकार दिनकर अमूप या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असतानाच दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेचा आणि हेल्मेट वापराच्या महत्त्वाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तरुणांनो, हेल्मेट घालणे ही केवळ पोलिसांची सक्ती किंवा दंड टाळण्याची बाब नाही, तर स्वतःचा जीव वाचविण्यासाठी घेतलेली महत्त्वाची खबरदारी आहे. ओंकारने हेल्मेट घातले असते तर कदाचित त्याचा जीव वाचण्याची शक्यता निर्माण झाली असती. कारण या अपघातात ओंकार च्या डोक्याला गंभीर मार लागून दुखापत झालेली दिसून आली. जर तो हेल्मेट घालून असता तर कदाचित ओंकार आपल्यामध्ये असता.तरीही या घटनेतून प्रत्येक दुचाकीस्वाराने बोध घेणे गरजेचे आहे.अनेक तरुण हेल्मेट जवळ असूनही ते डोक्यावर घालत नाहीत. काहींना हेल्मेटमुळे गैरसोय होते, हेल्मेटची अडचण वाटते.तर काहींना आपल्या वाहन चालविण्याच्या कौशल्याचा अतिआत्मविश्वास असतो. मात्र, रस्त्यावर अपघात सांगून होत नाही. समोरून येणाऱ्या वाहनाची चूक, अचानक उद्भवलेली परिस्थिती किंवा वाहनावरील नियंत्रण सुटणे, यामुळे क्षणात आयुष्य बदलू शकते. हेल्मेट हे अपघात रोखू शकत नसले तरी अपघाताच्या वेळी डोक्याला होणाऱ्या गंभीर दुखापतीचा धोका कमी करण्यास मदत करते. त्यामुळे दुचाकी चालवताना चालकासह मागे बसणाऱ्या व्यक्तीनेही दर्जेदार, योग्य आकाराचे हेल्मेट व्यवस्थित पट्टा लावून वापरणे आवश्यक आहे.

महिलांच्या पुढाकारातून पुण्यात जलसंवर्धनाचा जागर

- ५०० हून अधिक महिलांची पाणी बचतीची सामूहिक शपथ
- मंगला पाटील यांचे महिलांना आवाहन



पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवसेंदिवस वाढणारी पाण्याची गरज आणि भविष्यात उद्भवू शकणारी पाणीटंचाई लक्षात घेता जलसंवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जागरूक होणे आवश्यक आहे. विशेषतः महिलांनी पाणी बचतीचा संदेश केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो घराघरांत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे हीच काळाची गरज असून, महिलांच्या सामूहिक सहभागातून जलसंवर्धनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार या उपक्रमातून व्यक्त करण्यात आला.असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या मंगला पाटील यांनी केले.

पाणी बचत आणि जलसंवर्धनाचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यासाठी सद्गुरू कृपा प्रतिष्ठानच्या वतीने गोखलेनगर येथील पाच पांडव सभागृहात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात ५०० हून अधिक घरकाम करणाऱ्या महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जलसंवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना मंगला पाटील म्हणाल्या की, पाण्याचा अपव्यय टाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. घरातील दैनंदिन कामकाजात महिलांचा महत्त्वाचा सहभाग असल्याने पाणी बचतीची सवय निर्माण करण्यात त्या प्रभावी भूमिका बजावू शकतात.

महिलांनी स्वतःपासून सुरुवात करून कुटुंबीय, शेजारी आणि समाजामध्ये जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करावी. या कार्यक्रमाला मिळालेला महिलांचा मोठा प्रतिसाद पाहता पुण्यात जलसंवर्धनाची चळवळ अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आयोजन उमेश वाघ यांनी केले होते. यावेळी मुकुल माधव फाउंडेशनच्या रितू छाब्रिया यांनी दीपावलीनिमित्त उपस्थित महिलांना भेटवस्तू देऊन त्यांच्या सामाजिक उपक्रमातील सहभागाचे कौतुक केले. या कार्यक्रमाला योगेश रोकडे, महेश मंत्री, प्रवीण सिंह, नयना वाघ, कलावती घाणेकर, रेश्मा सकट, प्रकाश धामणे, अनिता मोरे, सोनम पोळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. रुपेश सोनवणे यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले, तर सचिन इंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कामगारांच्या हक्काच्या बोनसवर कंत्राटदारांचा डल्ला!

- यंदाही चार ते पाच कंत्राटदारांकडून बोनस थकवल्याचा आरोप
- कामगारांची दिवाळी अंधारात, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



खडकी (दै. आरंभ पर्व)

वर्षभर ऊन, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीत काम करूनही खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डातील कंत्राटी कामगारांच्या पदरी यंदाही निराशाच पडल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. दिवाळीचा सण तोंडावर असतानाही पात्र कामगारांना त्यांच्या हक्काचा बोनस मिळाला नसल्याने अनेक कामगारांच्या घरातील दिवाळीचा आनंद हिरावला गेला. संबंधित कंत्राटदारांकडे वारंवार मागणी करूनही बोनस देण्यात आला नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या विविध विभागांत स्वच्छता, आरोग्य आणि अन्य कामे करणारे कंत्राटी कामगार शहराच्या दैनंदिन व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. मात्र, याच कामगारांच्या सणासुदीच्या हक्कांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार पुढे आली आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार, गेल्या अनेक वर्षांपासून बोनसचा प्रश्न कायम असून यंदाही चार ते पाच कंत्राटदारांनी पात्र कामगारांना दिवाळीचा बोनस दिलेला नाही. दिवाळीपूर्वी बोनस मिळावा, यासाठी कामगारांनी संबंधित कंत्राटदारांकडे वारंवार मागणी केली. मात्र, त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नसल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. वर्षभर काम करूनही सणाच्या काळात आर्थिक मदत मिळत नसेल, तर कामगारांनी आपल्या कुटुंबाचा सण साजरा करायचा तरी कसा, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. बोनस न मिळाल्यामुळे अनेक कामगारांना मुलांचे कपडे, फराळ, मिठाई आणि घरातील इतर आवश्यक खर्च भागवताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. इतरांच्या घरात दिवाळीचा उत्साह असताना कामगारांच्या कुटुंबांना मात्र आर्थिक विवंचनेत दिवस काढावे लागल्याची खंत व्यक्त होत आहे.

प्रशासनाची जबाबदारी नेमकी काय?

कंत्राटदारांच्या माध्यमातून कामगारांची नियुक्ती केली जात असली, तरी कामगारांना लागू असलेल्या कायदेशीर लाभांची पूर्तता होत आहे की नाही, यावर संबंधित प्रशासनाने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. पात्र कामगारांना नियमानुसार बोनस मिळाला आहे की नाही, याची तपासणी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाने केवळ कंत्राटदारांकडून काम करून घेण्यापुरती भूमिका न ठेवता, कामगारांना मिळणारे वेतन, बोनस आणि इतर कायदेशीर लाभ यांचीही पडताळणी करावी, अशी मागणी कामगारांकडून होत आहे.

यंदा बोनस न दिल्याचा आरोप असलेल्या चार ते पाच कंत्राटदारांची तातडीने चौकशी करावी, संबंधित कामगारांची पात्रता व बोनस देयकांची तपासणी करावी आणि नियमांनुसार बोनस थकवला असल्यास संबंधितांवर कारवाई करून कामगारांना त्यांचा हक्क मिळवून द्यावा, अशी मागणी होत आहे. आता खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी या गंभीर तक्रारीची दखल घेणार का? संबंधित कंत्राटदारांकडून खुलासा मागवून कामगारांना न्याय मिळवून देणार का? की दरवर्षीप्रमाणे कंत्राटी कामगारांच्या बोनसचा प्रश्न पुन्हा दुर्लक्षित राहणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कामगारांच्या घामावर व्यवस्था चालते; मग त्यांच्या हक्काच्या बोनसच्या वेळी प्रशासन आणि कंत्राटदारांची जबाबदारी कुठे जाते? हा प्रश्न आज खडकीतील कंत्राटी कामगार उपस्थित करीत आहेत.

जनतेचा विश्वास सार्थ ठरविणार
नारायण गलांडे



- वडगाव शेरीतील प्रलंबित विकासकामांना प्राधान्य
- भाजी मंडईच्या प्रश्नावर अधिकाऱ्यांसमवेत पाहणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

सर्वसामान्य जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून पालिका सभागृहात प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली आहे. या विश्वासाला तडा जाऊ न देता वडगाव शेरी परिसरातील प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यास प्राधान्य देणार असल्याची ग्वाही महापालिका क्रीडा समितीचे अध्यक्ष नारायण गलांडे यांनी दिली.

प्रभाग क्रमांक ५ मधील वडगाव शेरी परिसरातील पुण्यनगरी येथील भाजी मंडईसह विविध समस्यांची पाहणी गलांडे यांनी महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांसमवेत केली. यावेळी ते बोलत होते.

गेल्या अनेक महिन्यांपासून धूळखात पडून असलेल्या भाजी मंडईची पाहणी करून गलांडे यांनी अधिकाऱ्यांशी विविध समस्यांबाबत चर्चा केली. मंडईतील अडचणी तातडीने दूर करून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावर अधिकाऱ्यांनीही येत्या काही दिवसांत मंडईच्या समस्यांवर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, छटपूजेसाठी आलेल्या महिला भगिनींचे गलांडे यांनी स्वागत केले. तसेच नदीघाट परिसरातील वाढलेली झाडेझुडपे आणि साचलेला कचरा जेसीबीच्या सहाय्याने हटवून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी बोलताना गलांडे म्हणाले की, पालिका निवडणुकीत मतदारांनी माझ्यावर विश्वास दाखवून सभागृहात काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या परिसरातील समस्या कोणताही संकोच न बाळगता माझ्यासमोर मांडाव्यात. त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील. जनतेने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविणे ही माझी जबाबदारी असून नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य राहील. महापालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रभागातील विविध ठिकाणी पाहणी करून त्यांनी रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा यांसह अन्य मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांचा आढावा घेतला. गलांडे यांच्या पुढाकारामुळे परिसरातील विविध विकासकामांमधील अडचणी दूर होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नारायण कांबळे यांनी मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



बारामती ते शिर्डी साई पालखी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान

बारामती (आरंभ पर्व) : साईइच्छा सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित बारामती ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याला गुरुवारी (दि. १२ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. साईइच्छा सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक बिरजू (भैय्या) मांढरे यांच्या नेतृत्वाखाली या पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. आमराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत (साळवेनगर) येथून निघालेल्या या पालखी सोहळ्यात हजारो साईभक्त व नाथभक्त सहभागी झाले होते. यावेळी जय शंकर महाराज मठ, जैनेकवाडी, बारामती येथील नाथभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुरज महाराज थोरात यांनी उपस्थित भक्तांना नाथ संप्रदायाचे महत्त्व, नाथांचा इतिहास, त्यांचा जन्म, जीवनकार्य आणि आध्यात्मिक परंपरा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रवचनातून नाथ संप्रदायाची शिकवण आणि आध्यात्मिक विचार भक्तांपर्यंत पोहोचविण्यात आले. यानंतर बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या हस्ते साईबाबांच्या पालखीची आरती करण्यात आली. आरतीनंतर टाळ-मृदंग, साईनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान झाले. या सोहळ्यामध्ये विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विद्यमान नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच हजारो साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण परिसर साईनामाच्या जयघोषाने भक्तिमय झाला होता. 'मुखवानी साई साई गाऊया, पायी शिर्डीला जाऊया!' या भक्तिमय संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या पालखी सोहळ्यामुळे बारामती शहरात धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

दूध विक्री दरात प्रतिलिटर ४ रुपयांची वाढ; १६ नोव्हेंबरपासून नवीन दर लागू

कात्रज (आरंभ पर्व) : इंधन, वाहतूक, पॅकिंग, मनुष्यबळ तसेच दूध खरेदी दरात सातत्याने होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर गाय आणि म्हशीच्या दूध विक्री दरात प्रतिलिटर चार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या बैठकीत घेण्यात आला. यामध्ये म्हशीच्या आणि गायींच्या दूधदरात प्रत्येकी चार रुपयांची वाढ होणार आहे. तसेच, दुग्धजन्य पदार्थांच्या दरातही १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात येणार आहे. या नवीन दरांची अंमलबजावणी सोमवार (ता. १६) पासून होणार आहे. दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक शुक्रवारी (ता. १३) पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित (कात्रज डेअरी) येथे संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत दूध व्यवसायातील वाढत्या उत्पादन खर्चाचा आढावा घेऊन दरवाढीचा निर्णय घेण्यात आला. मागील काही काळात डिझेलच्या दरात झालेली वाढ, वाहतूक खर्चात झालेली वाढ, साखरेच्या किमतीतील वाढ, पॅकिंग साहित्याचा खर्च आणि मनुष्यबळावरील खर्च यामुळे दूध प्रक्रिया व विक्री व्यवसायावरील आर्थिक भार वाढला आहे. त्यातच दूध उत्पादकांकडून दूध खरेदी करण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या दरातही वाढ झाली आहे. आगामी काळात दूध खरेदी दरात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता, या सर्व बाबींचा विचार करून विक्री दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस कात्रज डेअरीचे अध्यक्ष अरुण चांभारे, दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाचे मानद सचिव प्रकाश कुतवळ यांच्यासह महाराष्ट्र राज्यातील प्रमुख सहकारी आणि खासगी दूध संघांचे सुमारे ५० प्रतिनिधी उपस्थित होते.

यूएईत ट्रकची २३ वाहनांना धडक; तीन भारतीयांसह १४ जणांचा मृत्यू

फुजैराह (आरंभ पर्व) : संयुक्त अरब अमिरातीतील (यूएई) फुजैराह येथे गुरुवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. भरधाव ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रकने तब्बल २३ वाहनांना धडक दिली. या अपघातात तीन भारतीयांसह १४ जणांचा मृत्यू झाला, तर ३० जण जखमी झाले आहेत. मृत भारतीय केरळममधील मलप्पुरम जिल्ह्यातील एकाच कुटुंबातील होते. त्यात जुळ्या भाऊ-बहिणीचाही समावेश आहे. धडकेनंतर अनेक वाहनांनी पेट घेतला. आगीत काही मृतदेह पूर्णपणे जळाल्याने मृतांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी केली जात आहे. वाहनांना लागलेल्या आगीचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. फुजैराह शहराच्या प्रवेशमार्गावर मध्यरात्री हा अपघात झाला. या धडकेनंतर लागलेली आग वेगाने इतर वाहनांमध्ये पसरली. अपघातात एकूण २३ वाहनांचे नुकसान झाले. त्यात १८ कार आणि पाच ट्रकचा समावेश होता. मृतांमध्ये यूएई, ओमान, भारत, ब्राझील, पाकिस्तान, जॉर्डन आणि इजिप्त या सात देशांतील नागरिकांचा समावेश आहे. जखमी झालेल्या ३० जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी निम्म्या जणांना उपचारानंतर घरी सोडले आहे.

अनिकेत चिलप यांना दोन अशोक लेलँड ट्रकचे वितरण

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर युवकाच्या व्यावसायिक भरारीला बळ - संस्थापक अध्यक्ष संतोषशेठ घोगरे यांच्या पुणे जिल्हा बँकेतील संभाव्य उमेदवारीची सहकार क्षेत्रात चर्चा

येणेरे (दै. आरंभ पर्व)

ग्रामीण भागातील युवकांना व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गिरिजात्मक पतसंस्था, येणेरे यांच्या माध्यमातून सुरू आहे. याच सामाजिक आणि आर्थिक बांधिलकीचा प्रत्यय पुन्हा एकदा आला असून, लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर संस्थेच्या वतीने श्री. अनिकेत सुरेश चिलप यांना दोन अशोक लेलँड ट्रकचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी नवी प्रेरणा मिळणार आहे.



गिरिजात्मक पतसंस्था, येणेरे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोषशेठ घोगरे यांच्या हस्ते तसेच उपाध्यक्ष सचिनभाऊ जठार आणि सचिव शांताराम ढोले यांच्या उपस्थितीत ट्रकच्या चाव्या अनिकेत चिलप यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळाचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी संचालक सचिन ताजणे, सत्यवान घोगरे, ऋषिकेश वरपे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर नव्या व्यावसायिक वाटचालीला सुरुवात होत असल्याने उपस्थितांनी अनिकेत चिलप यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक भांडवलाची आवश्यकता असते. मात्र, योग्य आर्थिक मार्गदर्शन आणि संस्थात्मक पाठबळ मिळाल्यास ग्रामीण भागातील युवकही मोठ्या व्यवसायात यशस्वी होऊ शकतात. हीच भूमिका डोळ्यासमोर ठेवून गिरिजात्मक पतसंस्था युवकांना आर्थिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

दोन अशोक लेलँड ट्रकचे वितरण हा त्याच प्रयत्नांचा एक भाग असून, या माध्यमातून अनिकेत चिलप यांच्या वाहतूक व्यवसायाला नवी दिशा मिळणार आहे. संस्थेच्या माध्यमातून सभासदांचा आर्थिक विकास, व्यवसायवृद्धी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. दरम्यान, गिरिजात्मक पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोषशेठ घोगरे यांच्या आगामी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील संभाव्य उमेदवारीची सहकार क्षेत्रात चर्चा रंगू लागली आहे. विविध कार्यकारी सेवा सोसायटी गट तसेच पतसंस्था गटातून त्यांनी निवडणूक लढवावी, अशी मागणी विविध सहकारी संस्थांकडून होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यातील अनेक विविध कार्यकारी सोसायट्या आणि पतसंस्थांचा संतोषशेठ घोगरे यांना पाठिंबा असल्याचा दावा करण्यात येत आहे. सहकार क्षेत्रातील त्यांचा अनुभव, संस्थात्मक कामकाजातील सहभाग आणि ग्रामीण भागातील सहकारी संस्थांशी असलेला संपर्क या पार्श्वभूमीवर त्यांच्या संभाव्य उमेदवारीकडे सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

ग्रामीण भागातील युवकांना व्यवसायासाठी आर्थिक पाठबळ देणारा उपक्रम आणि दुसरीकडे सहकार क्षेत्रातील नेतृत्वाची संभाव्य वाटचाल, यामुळे गिरिजात्मक पतसंस्था, येणेरे ही संस्था परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

तक्रारी व प्रतिज्ञापत्रे सादर करण्यासाठी २३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या नऊ स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका आणि उत्तरतालिका फुटल्याप्रकरणी तक्रारी व निवेदने सादर करण्यासाठी चौकशी आयोगाने २३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी १६ नोव्हेंबरपर्यंत निवेदने सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. दिवाळीच्या सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, संबंधितांनी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुदतीत सादर करण्याचे आवाहन आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. 'एमपीएससी'च्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये झालेले कथित गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटीच्या प्रकरणांची सखोल चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने विशेष चौकशी आयोग गठीत केला आहे. या प्रकरणांशी संबंधित ठोस माहिती असलेल्या व्यक्ती, तसेच परीक्षार्थींना आपली निवेदने आयोगाने निश्चित केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या प्रारूपात १६ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन यापूर्वी करण्यात आले होते. मात्र, दिवाळी सणानिमित्त आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे उमेदवारांची गैरसोय होऊ नये, यासाठी ही मुदत आता २३ नोव्हेंबर पर्यंत वाढविण्यात आली आहे. या संदर्भात चौकशी आयोगाने परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सर्व संबंधितांनी आपली निवेदने मराठी किंवा इंग्रजी भाषेत आयोगाकडे सादर करावीत. या निवेदनांसोबत वैध ओळखपत्राची प्रत आणि दाव्याशी संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे अनिवार्य आहे. तसेच, प्रत्यक्ष निवेदनासह स्वप्रमाणित प्रतिज्ञापत्राची प्रत, निवेदन आणि कागदपत्रांची एक प्रत complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या अधिकृत ई-मेल आयडीवरही पाठविण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत.

पाणी सोडा, अन्यथा संघर्ष अटळ!

- **नीरा नदीच्या पाण्यासाठी सराटीत नेते अन् शेतकऱ्यांचा रास्ता रोको**

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

नीरा नदीपात्रात तातडीने पाणी सोडावे, या मागणीसाठी इंदापूर आणि माळशिरस तालुक्यातील शेतकरी व सर्वपक्षीय नेते एकवटले असून, सराटी येथे आक्रमक रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले. "पाणी आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं!" अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवत सर्वपक्षीय नेत्यांनी एकजूट दाखविल्याने या आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नीरा नदीपात्र कोरडे पडल्याने इंदापूर आणि माळशिरस तालुक्यातील शेतीपिके पाण्याअभावी संकटात सापडली आहेत. शेतीच्या सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची भीती निर्माण झाली आहे. एकीकडे शेतकरी पिके जगविण्यासाठी धडपडत असताना दुसरीकडे नदीपात्रात पाणी नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि नीरा नदीत हक्काचे पाणी तातडीने सोडण्याच्या मागणीसाठी सराटी येथे शेतकरी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले.



या आंदोलनात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी प्रत्यक्ष सहभागी होत शेतकऱ्यांच्या मागणीला पाठिंबा दिला. तसेच आप्पासाहेब जगदाळे, भरतशेठ शहा, प्रदीप गारटकर, श्रीमंत ढोले (सर), हनुमंत कोकाटे यांच्यासह इंदापूर व माळशिरस तालुक्यातील विविध पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे, पाण्याच्या प्रश्नावर सर्वपक्षीय नेत्यांनी एकाच व्यासपीठावर येत दाखविलेली एकजूट ही या आंदोलनाची प्रमुख ठळक बाब ठरली. राजकीय पक्ष, गट-तट आणि मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकत्र येत प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला.

नीरा नदीच्या पाण्याचा प्रश्न आता केवळ सिंचनापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो हजारो शेतकरी कुटुंबांच्या अस्तित्वाचा आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजेचा प्रश्न बनला आहे. त्यामुळे सराटीतील या रास्ता रोको आंदोलनातून उमटलेला शेतकऱ्यांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचणार का आणि नीरा नदीपात्रात प्रत्यक्ष पाणी कधी सोडले जाणार, याकडे आता इंदापूर-माळशिरस तालुक्यांतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

> "शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे, नदीपात्रात तातडीने पाणी सोडले पाहिजे," अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा यापुढे अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उपस्थित नेत्यांनी दिला.

गोपनीय माहिती, पोलिसांचा सापळा अन् गुन्ह्याची उकल; मेखळीत दोघांना बेड्या!

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

बारामती उपविभागात घरफोडी व चोरीच्या वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासह प्रलंबित गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने मोठी कारवाई केली आहे. वालचंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मानकरवस्ती येथील घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा लावत दोन आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे. या कारवाईत चोरीस गेलेले डीजेचे साहित्य आणि गुन्ह्यात वापरलेली युनिकॉर्न मोटारसायकल असा एकूण ५ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या गुन्ह्यात एकूण नऊ आरोपींचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. बारामती उपविभागात घरफोडी व इतर चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच घडलेले गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांनी पथकाला प्रभावी पेट्रोलिंग व संशयितांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या.



त्यानुसार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज व त्यांचे पथक बारामती उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. वालचंदनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ३६७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३३४ व ३०५(अ) अंतर्गत नोंद असलेल्या गुन्ह्यातील आरोपी साहिल शेख याने साथीदारांसह मानकरवस्ती येथून डीजेचे साहित्य चोरी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच संबंधित संशयित मेखळी (ता. बारामती) येथील बसस्थानक परिसरात येणार असल्याची खबर मिळाली.

मिळालेल्या माहितीची गांभीर्याने दखल घेत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने तातडीने मेखळी बसस्थानक परिसरात धाव घेत सापळा रचला. यावेळी संशयित साहिल जावेद शेख (वय १९, रा. गोखळी, ता. फलटण, जि. सातारा) याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसी तपासात त्याने आपल्या साथीदारांसह तीन मोटारसायकलवरून येऊन सदर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान गुन्हा करण्यासाठी युनिकॉर्न कंपनीची MH-11-CF-4427 क्रमांकाची मोटारसायकल वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत साहिल जावेद शेख (वय १९) आणि ओम शरद घाडगे (वय २१), दोघेही रा. गोखळी, ता. फलटण, जि. सातारा यांना ताब्यात घेतले. या कारवाईत चोरीस गेलेले डीजेचे मशीन व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ५ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या गुन्ह्यात एकूण नऊ आरोपींचा सहभाग असल्याचे तपासात समोर आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर आणि वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, पुणे ग्रामीणच्या पथकाने केली.

कारवाईत सहभागी पोलीस पथक

पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब कारंडे, सहायक फौजदार शिवाजी निकम, पोलीस हवालदार सचिन होळकर, सुलतान डांगे, स्वप्नील अहिवळे, पोपट नाळे, किशोर तेलंग, शैलेष स्वामी, गुलाबराव पाटील तसेच पोलीस कॉन्स्टेबल रहीस मुलाणी, तुषार चव्हाण आणि गणेश डेरे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. बारामती उपविभागातील चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने केलेल्या या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये धडकी भरली असून, पोलिसांच्या सतर्कतेचे आणि प्रभावी तपासाचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

हर्षवर्धन पाटील यांची सलग चौथ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध निवड!

उपाध्यक्षपदी छगन भोंगळे विराजमान; कारखान्याची पंचवार्षिक निवडणूकही सलग दुसऱ्यांदा बिनविरोध

- **शेतकरी व कामगारांना केंद्रस्थानी ठेवून पक्षविरहित कारभार करण्याचा हर्षवर्धन पाटील यांचा निर्धार**

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

महात्मा फुलेनगर-बिजवडी (ता. इंदापूर) येथील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्लीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची सलग चौथ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. तर उपाध्यक्षपदी छगन भोंगळे यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. गुरुवारी (दि. १२) झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या. कारखान्याच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा हर्षवर्धन पाटील यांची बिनविरोध मोहोर उमटल्याने सहकार क्षेत्रात या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



कारखान्याची सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठीची पंचवार्षिक निवडणूक हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच बिनविरोध पार पडली होती. विशेष म्हणजे, कारखान्याची सलग दुसरी पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध होण्याचा मान कारखान्याने मिळविला आहे. त्यानंतर नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. अध्यक्षपदासाठी हर्षवर्धन पाटील आणि उपाध्यक्षपदासाठी छगन भोंगळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा केली.

या निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व उपाध्यक्ष छगन भोंगळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना हर्षवर्धन पाटील यांनी कारखान्याच्या आगामी वाटचालीची दिशा स्पष्ट केली. ते म्हणाले की, कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखान्याचे कामकाज ओंकार शुगर अँड डिस्टिलरी यांच्या सहयोगातून सुरू असून, शासनाच्या मान्यतेने हा सहयोगी करार करण्यात आला आहे. या कराराचे एक वर्ष पूर्ण झाले असून दुसऱ्या वर्षाला सुरुवात झाली आहे. चालू सन २०२६-२७ चा गळीत हंगाम शुक्रवारच्या सायंकाळपासून पूर्ण क्षमतेने सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मागील गळीत हंगामासाठी कारखान्याने प्रतिटन ३,३५० रुपये दर जाहीर केला असून, त्यापैकी उर्वरित प्रतिटन १५० रुपयांची रक्कम येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी आणि कर्मचारी हेच कारखान्याच्या कामकाजाचे केंद्रबिंदू राहतील. कारखान्याचा कारभार एकजुटीने आणि पक्षविरहित पद्धतीने केला जाईल. कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असून, शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस कर्मयोगी कारखान्याला देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही हर्षवर्धन पाटील यांनी केले.

कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पाडण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार पार्थ पवार, जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपजिल्हाधिकारी यशवंत माने, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, प्रदीप गारटकर, प्रवीण माने, हनुमंतराव कोकाटे, अविनाश घोलप, तेजसिंह पाटील, अशोक घोगरे, डी. एन. जगताप यांच्यासह सर्वपक्षीय नेते, शिवसेना ठाकरे गट, शेतकरी संघटना, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सभासदांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन सर्वांनी दाखविलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

> यावेळी कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक मंडळ तसेच ओमराजे बोत्रे-पाटील, लालासाहेब पवार, उदयसिंह पाटील, विलासराव वाघमोडे, ॲड. कृष्णाजी यादव, जयकुमार कारंडे, गोविंद रणवरे, ॲड.मनोहर चौधरी, पिंटू काळे, उत्तम जाधव, विक्रांत कोरटकर, मनोज मोरे, अशोक शिंदे, आबासाहेब शिंगाडे, सुरेश मेहेर, दादासाहेब घोगरे, किरण पाटील, महादेव शेंडगे, अंकुश पाडुळे आदींनी उपस्थित राहून सत्कार केला. कार्यकारी संचालक विजय शिर्के, जनरल मॅनेजर रणजित तावरे यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालयीन अधीक्षक शरद काळे यांनी केले.

थोडक्यात पण महत्वाचे



‘गोकुळ’च्या नव्या संचालक मंडळाचा कारभार सुरू, राजवट संपली

कोल्हापूर (आरंभ पर्व) : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) नूतन संचालक मंडळाने शुक्रवारी (दि. १३) अधिकृतपणे कामकाजाला सुरुवात केली. चेअरमन राजेश पाटील यांच्यासह संचालकांनी ताराबाई पार्क येथील ‘गोकुळ’च्या कार्यालयात अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. यामुळे सहा महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेली प्रशासकीय राजवट संपुष्टात आली. पहिल्याच दिवशी नूतन अध्यक्षांनी प्रशासकीय काळातील कामकाजाचा आढावा घेत महत्त्वाच्या निर्णयांची माहिती घेतली. प्रशासकीय राजवटीत कोणते निर्णय घेतले, दूध संकलनाची स्थिती काय राहिली, संघाच्या आर्थिक व्यवहारांवर आणि नफा-तोट्यावर काय परिणाम झाला, याची सविस्तर माहिती पाटील यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली. ‘अमूल’ने दूध विक्री दरात वाढ केल्याने ‘गोकुळ’लाही दरवाढीचा विचार करावा लागणार आहे. मात्र, याबाबत महायुतीतील मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार विनय कोरे यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांशी चर्चा केली जाईल. मुंबई आणि पुण्यातील दूध वितरकांचीही मते जाणून घेतली जातील.‘गोकुळ’च्या सर्व संचालकांना विश्वासात घेऊनच दूध दरवाढ किती करायची, याचा अंतिम निर्णय घेतला जाईल, असे चेअरमन राजेश पाटील यांनी सांगितले. नूतन संचालक मंडळ मंगळवारी (दि. १७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. या भेटीत संघाशी संबंधित महत्त्वाचे प्रश्न आणि प्रलंबित विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाशिवाय भोगवटा प्रमाणपत्र नाही !

मुंबई (आरंभ पर्व) : नवीन इमारतींना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. परंतु याची अनेक सोसायटीमध्ये अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ कागदोपत्री न ठेवता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी सांडपाणी प्रकल्पाशिवाय भोगवटा प्रमाणपत्र न देण्याचा निर्णय घेतला. याची तातडीने अंमलबजावणीही करण्यात येणार आहे. मुंबई सध्या पाण्याची मोठी कमतरता असून यासाठी नवनवीन उपायोजना महापालिकेने हाती घेतल्या आहेत. यात नवीन धरणाच्या बांधण्यासह समुद्राचे खारे पाणी गोडे करणे, तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात येत आहेत. निवासी व व्यावसायिक इमारतींमध्ये दररोज सांडपाणी मोठ्या प्रमाणात तयार होते. त्यामुळे सध्याची पाण्याची कमतरता लक्षात घेता, या सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून त्या पाण्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त कामासाठी करणे आवश्यक आहे. पण भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात पुरते सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबवले जातात. पण त्याची पुढे अंमलबजावणी होत नाही. मुंबई शहर व उपनगरात बांधकाम होणाऱ्या सर्व नवीन इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करताना इमारतीमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणारी यंत्रणा बसवणे व ती कार्यान्वित करण्याकरिता स्वतंत्र विशेष कृती आराखडा तयार केला जाणार आहे. प्रक्रिया यंत्रणा केवळ कागदोपत्री न ठेवता, इमारतीच्या बांधकामाच्या टप्प्यातच तिची उभारणी केली जावी. २० हजार चौरस मीटरपेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असलेल्या किंवा ५० पेक्षा जास्त कुटुंबे राहणाऱ्या नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बसवणे आवश्यक आहे. व्यावसायिक आणि औद्योगिक इमारती. मॉल, हॉटेल्स, रुग्णालये, आयटी पार्क्स आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'ऑरेंज' किंवा 'रेड' श्रेणीत येणाऱ्या उद्योगांना क्षेत्रफळाची अट न ठेवता सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे अनिवार्य आहे.

बाबीर गडावर भक्तीचा महासागर!

तीन दिवसांत तीन लाख भाविकांची मांदियाळी; नेतेमंडळीही गजढोलाच्या तालावर थिरकली!

- ‘बाबीरबुवांचा चांगभलं’च्या जयघोषाने रुई परिसर दुमदुमला; यात्रेत पाच हजार धोंगड्यांची विक्री, गजढोल स्पर्धेने वाढवली रंगत
- भाविकांसाठी चोवीस तास आरोग्यसेवा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



आरोग्य विभागाच्या वतीने वैद्यकीय बूथ उभारून भाविकांसाठी चोवीस तास आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. नेचर डिलाईट, सोनाई आणि हर्षवर्धन पाटील मोटारवाहतूक संघाच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तहसीलदार जीवन बनसोडे, ग्रामपंचायत आणि देवस्थानचे अध्यक्ष अजितसिंह पाटील यांनी भाविकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच माजी सरपंच यशवंत कचरे, ॲड. अमरसिंह मारकड, नानासाहेब थोरात, पांडुरंग डोंबाळे आणि बाळासाहेब भगत यांनीही यात्रेच्या यशस्वी नियोजनासाठी परिश्रम घेतले. एकंदरीत, बाबीर गडावरील यात्रा म्हणजे केवळ धार्मिक सोहळा नसून श्रद्धा, परंपरा, लोककला, सामाजिक एकोपा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा उत्सव ठरली. तीन दिवसांत तीन लाख भाविकांची उपस्थिती, पाच हजार धोंगड्यांची विक्री, गजढोलाचा दणदणाट आणि नेतेमंडळींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे यंदाची बाबीर गडावरील यात्रा अविस्मरणीय ठरली.

कळस (दै. आरंभ पर्व)

इंदापूर तालुक्यातील रुई येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बाबीर गडावर बाबीर देवाच्या यात्रेनिमित्त भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अभूतपूर्व सोहळा अनुभवायला मिळाला. तीन दिवस चाललेल्या या यात्रेत राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे तीन लाख भाविकांनी बाबीर देवाचे दर्शन घेतले. ‘बाबीरबुवांचा चांगभलं’च्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर, गजढोलाचा निनाद, पारंपरिक धार्मिक विधी आणि भाविकांची अलोट गर्दी यामुळे बाबीर गडावर जणू भक्तीचा महासागरच अवतरला होता. बाबीर देवाच्या यात्रेनिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. यात्रेच्या निमित्ताने धार्मिक परंपरा, लोकसंस्कृती, गजढोल स्पर्धा आणि पारंपरिक कार्यक्रमांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. विशेष म्हणजे, राजकीय क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनीही यात्रेला उपस्थिती लावत गजढोलाच्या तालावर ठेका धरल्याने यात्रेची रंगत आणखी वाढली. यात्रेनिमित्त विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, महादेव जानकर, कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार, माजी सभापती प्रवीण माने आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम यांनी बाबीर देवाचे दर्शन घेतले.

मंगळवारी (दि. १०) दिवाळी पाडव्याच्या दिवशी सांगमनेर तालुक्यातील निमोणे येथून साहेबराव मंडलिक यांच्या नेतृत्वाखाली हजारो भाविकांची पायी दिंडी रुई गावात दाखल झाली. त्यानंतर बाबीर देवाच्या पालखीने मंदिराकडे प्रस्थान केले. गुलालाची उधळण, ढोलांचा निनाद आणि भक्तिमय वातावरणात पालखी मंदिरस्थळी पोहोचली. मानकरी विश्वास थोरात यांनी देवाचा घट हलविल्यानंतर यात्रेला विधिवत सुरुवात झाली.

बुधवार हा यात्रेचा मुख्य दिवस असल्याने पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दिवसभर नवसफेडीचे धार्मिक कार्यक्रम सुरू होते. अमोल मिसे मित्रमंडळाच्या वतीने आयोजित गजढोल स्पर्धेने यात्रेच्या उत्साहात विशेष भर घातली. या स्पर्धेने संपूर्ण परिसराचे लक्ष वेधून घेतले. विशेष म्हणजे, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, महादेव जानकर, आमदार रोहित पवार, आमदार हेमंत ओगले आणि प्रवीण माने यांनीही गजढोल वादनाचा आनंद घेत ठेका धरला. नेतेमंडळींच्या सहभागामुळे उपस्थित भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

बाबीर गडावरील यात्रेचे धार्मिक महत्त्व जितके मोठे आहे, तितकीच या यात्रेची पारंपरिक बाजारपेठही प्रसिद्ध आहे. यंदाच्या यात्रेत घोंगडी बाजारात सुमारे पाच हजार घोंगड्यांची विक्री झाली. याशिवाय घरगुती लाकडी वस्तू आणि इतर साहित्याच्या बाजारपेठेतही मोठी आर्थिक उलाढाल झाली. महिलांनी घरगुती वस्तूंच्या खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती. यात्रेमुळे व्यापारी, विक्रेते आणि स्थानिक व्यावसायिकांनाही चांगला व्यवसाय मिळाला. गुरुवारी यात्रेच्या तिसऱ्या दिवशी नवसाच्या बाळांना पाळण्यात बसवून झुला देण्याचा पारंपरिक विधी, भाकणूक आणि गजढोलाचे कार्यक्रम पार पडले. धार्मिक श्रद्धा आणि परंपरेचा वारसा जपत भाविकांनी या कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यात्रेदरम्यान लाखो भाविकांची गर्दी आणि वाहनांची मोठी वर्दळ लक्षात घेता भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासन व आयोजकांच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियोजन करण्यात आले होते.

फोन टॅपिंगचे आरोप फेटाळत भाजपचा पलटवार

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर फोन टॅपिंगचे केलेले गंभीर आरोप भारतीय जनता पक्षाने (भाजप) शुक्रवारी स्पष्टपणे फेटाळून लावले आहेत.

या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देताना केरळम भाजपचे प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनी गांधी यांच्यावर बोचरी टीका केली असून, त्यांनी आपल्या डोक्याची तपासणी करून घ्यावी, असा टोला लगावला आहे. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर व्हिडीओ शेअर करत आपला मोबाईल फोन टॅप केला जात असल्याचा आणि पंतप्रधान विदेशी शक्तींच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा दावा केला होता. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना राजीव चंद्रशेखर यांनी भाजपची भूमिका मांडली. चंद्रशेखर म्हणाले की, 'राहुल गांधींना पूर्ण आदराने मी एवढेच सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या डोक्याची तपासणी करून घ्यावी. त्यांचा फोन टॅप करण्याची कोणालाही काळजी नाही आणि त्यात कोणालाही रस नाही.

जर कोणाला कशात रस असेलच, तर तो या गोष्टीत आहे की, त्यांचा मेंदू दिवसेंदिवस केवळ खोट्या गोष्टींवरच कसा चालतो.' भाजपच्या इतर नेत्यांनीही राहुल गांधींच्या भूमिकेवर टीका केली आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनीही गांधींवर निशाणा साधत, त्यांचा फोन कोणीही हॅक करण्याची गरज नसल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे, राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना दिलेल्या समोरासमोर चर्चेच्या आव्हानावर भाजपने यापूर्वीच आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

येरवडा खुले कारागृहात बंद्यांसाठी संतविचारांचा जागर!

ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांचे ‘जीवनातील स्वहिताचा मार्ग’ विषयावर प्रेरणादायी प्रवचन

पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळीच्या मंगलमय पर्वानिमित्त बंद्यांच्या जीवनात आनंद, सकारात्मकता आणि आध्यात्मिक विचारांची ज्योत प्रज्वलित करण्याच्या उद्देशाने येरवडा खुले कारागृहात ‘आनंदी दिवाळी’ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. धनत्रयोदशीच्या शुभदिनी रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत आयोजित या कार्यक्रमात जगतगुरू संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांनी ‘जीवनातील स्वहिताचा मार्ग’ या विषयावर प्रेरणादायी प्रवचन केले. समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयवंत हिरे यांच्या माध्यमातून या विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. कारागृहातील बंद्यांना संतविचारांची



ओळख करून देऊन त्यांच्या मनात आत्मचिंतन, सकारात्मकता आणि जीवनात परिवर्तन घडविण्याची प्रेरणा निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे आयोजन कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे येथील सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर, प्रसिद्ध माईंड पॉवर ट्रेनर दत्ताजी कोहिनकर, प्रसिद्ध अभिनेते सिद्धेश्वर झाडबुके, समर्थ मोरे, अशोक महाराज काळे, दिनेश कुंभार, रायकर सर, सामाजिक कार्यकर्ते घनश्याम निम्हण, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मृणाल इनामदार, पिंकॅथॉन ॲम्बेसेडर व नऊवारी साडी रनर, दीपाताई परब, रणरागिनी महिला बाउन्सर ग्रुप तसेच सामाजिक कार्यकर्त्या आयेशा तांबोळी यांची उपस्थिती होती. प्रवचनादरम्यान ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे देहूकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांच्या माध्यमातून जीवनाचे खरे मर्म उलगडून सांगितले. आत्मपरीक्षण, सद्विचार, परोपकार, प्रामाणिकपणा, संयम, कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी आणि चांगल्या कर्मांचे महत्त्व त्यांनी विशद केले.

माणसाने भूतकाळातील चुकांमधून शिकून वर्तमानकाळात योग्य मार्गाचा स्वीकार करावा आणि भविष्यात सन्मानाने व सकारात्मकतेने जीवन जगावे, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. जीवनात आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी आत्मविश्वास, संयम आणि चांगल्या विचारांची साथ आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

क्षेत्रीय कार्यालय बनले तळीरामांचे आगार

- नागरिकांनी वाचला समस्यांचा पाढा
- स्वच्छतागृहांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याचा अभाव अन् अस्वच्छतेचे साम्राज्य
- क्षेत्रीय कार्यालय असून अडचण, नसून खोळंबा!

पुणे : सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

महापालिकेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळवून देणारे येरवडा-खराडी क्षेत्रीय कार्यालय सध्या विविध समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. कार्यालयाची इमारत आणि परिसरातील अस्वच्छता, स्वच्छतागृहांची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याचा अभाव, तुटलेल्या खिडक्यांच्या काचा आणि बंद पडलेल्या पंपिंग स्टेशनच्या जागेचा तळीरामांकडून होणारा वापर यामुळे नागरिकांसह कर्मचारी त्रस्त झाले आहेत. कार्यालयाच्या परिसरात गुटखा खाऊन थुंकण्याचे प्रकारही सर्रास सुरू असल्याने हे क्षेत्रीय कार्यालय आहे की तळीराम आणि गुटखाधारकांचा अड्डा, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. काही महिन्यांपूर्वी येरवडा, धानोरी आणि कळस प्रभागांचा समावेश असलेल्या या क्षेत्रीय कार्यालयाची नव्या प्रभागरचनेनुसार पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यानुसार आता येरवडा, वडगाव शेरी आणि



खराडी प्रभागांचा समावेश या कार्यालयांतर्गत करण्यात आला आहे. संबंधित इमारत तीन मजली असून, तळमजल्यावर रेशनिंग कार्ड कार्यालय, आधार कार्ड केंद्र आणि कर विभागाची कार्यालये आहेत. पहिल्या मजल्यावर पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक चार यांचे कार्यालय, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर येरवडा क्षेत्रीय कार्यालय कार्यरत आहे.

त्यामुळे सकाळपासून संध्याकाळपर्यंत या इमारतीत नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना वर्षभर अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. केवळ नागरिकच नव्हे, तर अधिकारी आणि कर्मचारीदेखील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे त्रस्त झाले आहेत.

इमारतीतील प्रत्येक मजल्यावर कर्मचारी आणि नागरिकांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. तळमजल्यावरील स्वच्छतागृहात पाण्याची सुविधा असली, तरी तेथील बेसिन गेल्या अनेक वर्षांपासून तुटलेल्या अवस्थेत आहे. त्याचे काही साहित्यही चोरीला गेले आहे. त्यातच स्वच्छतागृहांच्या भिंतींवर गुटखा आणि तंबाखूच्या पिचकाऱ्यांचे डाग दिसून येत असून, कोपऱ्यांमध्ये गुटख्याच्या पुड्या टाकण्यात येत आहेत. त्यामुळे स्वच्छतागृहांमध्ये स्वच्छतेऐवजी अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे.

विशेष म्हणजे, पहिल्या मजल्यावर स्वच्छतागृह उपलब्ध असतानाही त्याला कुलूप लावण्यात आल्याने नागरिकांना दुसऱ्या किंवा तळमजल्यावरील स्वच्छतागृहाचा वापर करावा लागत आहे. स्वच्छतागृह साफ करण्याचे साहित्यही त्याच ठिकाणी टाकून ठेवण्यात येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिकेने स्वच्छतागृहांसाठी वापरण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असली,



तरी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी तीन मजले उतरून तळमजल्यावर जावे लागते. गेल्या अनेक वर्षांपासून ही समस्या कायम असून, प्रशासनाकडून त्यावर अद्याप उपाययोजना करण्यात आलेली नाही. क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीलगतच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे पंपिंग स्टेशन आहे. मात्र, हे पंपिंग स्टेशन अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. या परिसरातील मोकळ्या जागेचा वापर नागरिक आणि महापालिका कर्मचारी वाहनतळासाठी करतात. मात्र, काही मद्यपींकडून या जागेचा गैरवापर करून खुलेआम मद्यपान केले जात असल्याचे चित्र आहे.

बंद पंपिंग स्टेशनच्या परिसरात मद्यपींचा वावर वाढल्याने विशेषतः महिला नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत ठोस कारवाई करण्याऐवजी संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

कार्यालयाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील खिडक्यांच्या काचा फुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पावसाचे पाणी थेट कार्यालयात शिरते. परिणामी, तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पंपिंग स्टेशनच्या परिसरात विद्युत पाइप अस्ताव्यस्त पडलेले असून, त्यामध्ये पावसाचे पाणी साचत आहे. या साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. परिसरातील राडारोडाही अद्याप हटविण्यात आलेला नाही. एकीकडे महापालिकेचा आरोग्य विभाग नागरिकांमध्ये पावसाळी आजारांबाबत जनजागृती करीत असताना दुसरीकडे महापालिकेच्याच कार्यालय परिसरात अस्वच्छता आणि डासांच्या उत्पत्तीला पोषक परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र आहे.

मोहल्ला कमिटीच्या बैठकीत नागरिकांचा संताप!

दोनच दिवसांपूर्वी येरवडा-खराडी क्षेत्रीय कार्यालयात सहायक आयुक्त प्रकाश वालगुडे यांच्या नेतृत्वाखाली मोहल्ला कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीत उपस्थित नागरिकांनी क्षेत्रीय कार्यालयातील समस्यांचा पाढा वाचत अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विविध समस्यांबाबत नागरिकांनी आवाज उठवून प्रशासनाच्या कारभारावर आक्षेप घेतल्याने ही बैठक आरोप-प्रत्यारोप आणि सवाल-जवाबांनी गाजल्याची चर्चा कार्यालय परिसरात रंगली होती.

कोट्यवधींचा महसूल देणाऱ्या कार्यालयाचीच दुरवस्था!

येरवडा, वडगाव शेरी आणि खराडी या महत्त्वाच्या भागांतून महापालिकेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. असे असतानाही या भागातील नागरिकांच्या समस्यांचे निवारण करणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयाचीच अवस्था बिकट असेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कार्यालयातील स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, खिडक्यांची दुरुस्ती, बंद पंपिंग स्टेशन परिसरातील अतिक्रमण व मद्यपानाचे प्रकार रोखणे, राडारोडा हटविणे आणि स्वच्छता राखणे यांसह विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. यासंदर्भात क्षेत्रीय कार्यालयाचे नवनियुक्त सहायक आयुक्त प्रकाश वालगुडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे ८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ साळुंके ८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!



आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार
NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!